
# मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर, २०२५
पृष्ठे ६८   किंमत : रु.१५
वर्ष पंचविसावे
अंक बारावा



## जागर वाचनसंस्कृतीचा

वाचनसंस्कृती घरोघरी
तिथे फुले ज्ञानपंढरी

## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
₹ ३०,०००/-

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
₹ २०,०००/-

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦डिसेंबर २०२५ ♦वर्ष पंचविसावे ♦अंक बारावा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाऊस


## – अनुक्रमणिका –


**संपादकीय** ४
**उपक्रम** १०
**प्रकाशन समारंभ** १२
**हस्तांतरण समारंभ** १४
**पुस्तकाच्या पानांतून**
सामक्षा १६
सांजवा २६
विरहवास ३६
इंडियाज रेल्वेमॅन ४२
डेंजरस माइंड्स ४८
**अभिप्राय** ५४
**दिनविशेष** ६०



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.


'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## जागर वाचनसंस्कृतीचा

दिवाळी सर्वत्र उत्साहात साजरी झाली. साहजिकच, चैतन्याची लकेर सर्वत्र उमटली. आकाशकंदील, आकर्षक पणत्या यांबरोबरच दिवाळीच्या विशेष फराळाचाही आस्वाद सगळ्यांनी घेतला. या निमित्ताने, विविध आशय-विषयांना वाहिलेल्या दिवाळी अंकांच्या वाचनाचाही आनंद बहुतेकांनी लुटला असेल. दिवाळीच्या फराळाचे पदार्थ ज्याप्रमाणे आपली रुची वाढवतात, त्याचप्रमाणे वैविध्यपूर्ण दिवाळी अंक आपली बौद्धिक रुची वाढवणारे असतात. हा साहित्यफराळ दीर्घ काळ आपली सोबत करणारा... नाही का!

मुळातच, आपल्या मराठी भाषेची 'स्वतः'ची अशी प्रदीर्घ परंपरा आहे. 'ऐसी अक्षरे रसिके मेळविन,' 'परि अमृतातेहि पैजा जिंके' असं ठामपणे; पण ओघवत्या वाणीत सांगणाऱ्या संत ज्ञानेश्वरांपासून ते अगदी आजच्या आघाडीच्या, तसंच नवोदित लेखकांपर्यंत सगळ्यांचीच मांदियाळी त्यात आहे. विविध साहित्यप्रकारांनी मराठी साहित्यविश्व समृद्ध



केलं आहे. त्यामध्ये प्रगल्भ विचार देणाऱ्या व केवळ मनोरंजनात्मक अशा सर्वच साहित्यकृती आहेत. त्याचप्रमाणे, अनुवादाचं खूप मोठं दालन वाचकांच्या वाचनकक्षा रुंदावताना दिसतं. आता तर मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा प्राप्त झालाय, ही मोठी सन्मानाची बाब होय.

अशा समृद्ध भाषेचा, लेखकांचा आणि त्यांच्या साहित्यकृतींचा-लेखनाचा जागर अनेक उपक्रमांमधून सातत्याने होताना दिसतो. विविध ग्रंथ-प्रदर्शनं, ग्रंथ-महोत्सव, साहित्यसंमेलनं यांचा अंतर्भाव त्यात होतो. अशा सर्वच उपक्रमांची-ग्रंथ-महोत्सवांचीही 'विशिष्ट' अशी परंपरा आहे; परंतु त्यातही मुख्यत्वेकरून, 'लेखक-प्रकाशक-वाचक' असा त्रिवेणी गोफ इथे गुंफला जातो.

त्यामधून, अतिशय दर्जेदार वाङ्मय वाचकांसाठी उपलब्ध होतं. अनेकविध पुस्तकं-ग्रंथ तर असतातच; पण दुर्मिळ अशीही अनेक पुस्तकं या निमित्ताने वाचकांसाठी उपलब्ध होतात. तो अनोखा ठेवाच असतो. या उपक्रमांचं एक वैशिष्ट्य म्हणजे, केवळ ग्रंथ-विक्रीपुरतंच सीमित न राहता, त्याच्याही पलीकडचा प्रगल्भ अनुभव हे उपक्रम देतात. किंबहुना, आपल्या आवडत्या लेखकांनाही भेटण्याचा छान योग त्याद्वारे जुळून येतो. वैविध्यपूर्ण-वैशिष्ट्यपूर्ण लेखन जेव्हा वाचकांसमोर येतं, तेव्हा वाचकवर्ग निश्चितच 'ज्ञानोमयं आत्मा' या दृष्टीने समृद्ध होतो; कारण प्रत्येक पुस्तक काही ना काही सांगत असतं. ते जाणून घेण्याद्वारे आपला एकूणच जाणिवांचाही स्तर उंचावतो. एक प्रकारे, असा हा 'वाचनसंस्कृतीचा जागर' केला जातो.

अशा काही उपक्रमांचा उल्लेख इथे केलाच पाहिजे. 'राष्ट्रीय पुस्तक न्यास(एनबीटी)' यांचं ग्रंथ-प्रदर्शन दि.२२ नोव्हेंबर ते दि. ३० नोव्हेंबर २०२५ या दरम्यान नागपूर येथील रेशीमबाग मैदानावर संपन्न झालं. 'पुस्तक संस्कृती'चा उत्सवच या निमित्ताने साजरा झाला. दर वर्षीप्रमाणे, याही वर्षी दि.१३ डिसेंबर ते दि.२१ डिसेंबर २०२५ या दरम्यान पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर एनबीटीचं ग्रंथ-प्रदर्शन संपन्न होणार आहे. एनबीटीच्या या महोत्सवाचं हे तिसरं वर्ष आहे. या

संदर्भात, एनबीटीचे पुणे येथील ग्रंथ-महोत्सवाचे संयोजक श्री. राजेशजी पांडे यांचे विशेष आभार. तसंच, नागपूर येथील ग्रंथ-महोत्सवाच्या संबंधित संयोजकांचे विशेष आभार. इथे विशेष उल्लेख करावासा वाटतो, की 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे 'ऑपरेशन सिंदूर' हे पुस्तक पुढील पुस्तक-महोत्सवात वाचकांसाठी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

त्याचप्रमाणे, '९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' दि. १, २, ३ आणि ४ जानेवारी २०२६ दरम्यान ऐतिहासिक वारशाने समृद्ध असलेल्या साताऱ्यात संपन्न होणार आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लेखक विश्वास पाटील हे या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत.

महत्त्वाचं म्हणजे, या सर्वांच्या माध्यमातून साहित्यविषयक आदान-प्रदान घडतं. मात्र, लक्षात घेण्याजोगी विशेष बाब अशी की, साहित्याच्या बाबतीत- 'साहित्य हा समाजाचा आरसा आहे' असं जे म्हटलं जातं, त्याचा अनुभव येतो. किंबहुना, साहित्य आणि समाज यांचा अनिवार्य असा अनुबंध अशा उपक्रमांमधून प्रतीत होतो-दृढ होतो. तसंच, 'लेखक-प्रकाशक-वाचक' यांचं परस्परांशी नातं दृढ होतं. म्हणूनच, आपण सर्व जण अशा ग्रंथ-महोत्सवांत, साहित्यसंमेलनात सक्रिय सहभागी होऊ या आणि साहित्यफराळाचा अमर्याद आनंद घेण्यासह व वाचनसंस्कृतीचा जागर करण्यासह पुस्तकांशी-लेखकांशी आणि अर्थातच प्रकाशकांशीही असलेला आपला अनुबंध दृढ करू या.


अखिल
मेहता

**नवी संहिता... नवा आशय...**

# जगता-जगता

## महादेव मोरे


जगता-जगता सापडे दुर्गम वाट, तीच खऱ्या
प्रयत्नांची सुंदर, वैविध्याने भरलेली
अनुभवसमृद्ध पायवाट!




**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# हिडन इन प्लेन साइट

## जेफ्री आर्चर
अनुवाद
## सविता दामले




मास्टर स्टोरी टेलर जेफ्री आर्चर यांची विल्यम
वॉरिक मालिकेतील नवी अफलातून कादंबरी...

**किंमत : ५५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**



टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर
– थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook
available on :
Google Play Books
amazonkindle
Get it on Apple Books


# उपक्रम

## ऐतिहासिक नगरीतील भव्य ग्रंथ-प्रदर्शन महोत्सव

पुणे : महाराष्ट्रातील सातारा हे ऐतिहासिक वारसा लाभलेलं शहर आहे. याच साताऱ्यात ७ ते १० नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत ‘सातारा ग्रंथ-प्रदर्शन महोत्सव’ पुस्तकप्रेमींच्या सान्निध्यात पार पडला. प्रदर्शनाच्या निमित्तानेही वाचनसंस्कृती बहरत आहे, याचा प्रकाशक म्हणून आनंदच होत आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या विविधांगी साहित्याला जाणणारा वाचकवर्ग पुस्तकखरेदीतून व्यक्त होत होता. या प्रदर्शनात मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनाला सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांची विशेष उपस्थिती लाभली. मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल मेहता यांनी शिवेंद्रराजे भोसले यांना ‘लीडिंग फ्रॉम द बॅक’ हे नवीन प्रकाशित पुस्तक भेट म्हणून दिलं. हा क्षण या प्रदर्शनाचं मुख्य आकर्षण ठरला. ‘द सर्कल ऑफ लाइफ’, ‘हिडन हिंदू भाग १ ते ३’, ‘फ्रेंच राज्यक्रांती आणि बादशहा नेपोलियन’, ‘मृत्युंजय’ यांसारख्या

जुन्या-नव्या पुस्तकांना जुन्या-नव्या वाचकांनी दिलेली पसंतीची पावती ही आनंदाची बाब ठरली.

◆



# प्रकाशन

## देशात अर्थसंकल्पीय तुटीपेक्षा विश्वासाची तूट अधिक : *डॉ. रघुनाथ माशेलकर*

पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस आणि रोटरी क्लब ऑफ पुणे(कोथरूड) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी, सुमंत मुळगांवकर ऑडिटोरियम, सेनापती बापट रोड, पुणे येथे 'लीडिंग फ्रॉम द बॅक : असाध्य ते साध्य करा' या मराठी अनुवादित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पार पडला. टाटा मोटर्सचे माजी सीईओ 'श्री. रवि कांत' यांच्या लेखणीतून कॉर्पोरेट क्षेत्रातील पडद्यामागच्या नेतृत्वाला उजेडात आणणारं हे प्रसिद्ध पुस्तक आहे. गेल्या चाळीस वर्षांच्या अनुभवांची पोतडीच रवि कांत सरांनी या पुस्तकातून उघड केली आहे. सुप्रसिद्ध अनुवादिका सुप्रिया वकील यांनी मराठी वाचकांसाठी त्यांच्या अनुवादशैलीतून हा मौल्यवान ठेवा आणला आहे.

'लीडिंग फ्रॉम द बॅक'च्या अनुवादाच्या प्रकाशनाच्या वेळी लेखक रवि कांत, अनुवादिका सुप्रिया वकील, रोटरी क्लब ऑफ पुणे(कोथरूड)च्या गायत्री लडकत आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल

मेहता हे मान्यवर उपस्थित होते.

त्याचप्रमाणे, जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. डॉ. रघुनाथ माशेलकर आणि रवि कांत यांनी पुस्तकाच्या अनुषंगाने नेतृत्वासंबंधीच्या अनेक घटकांवर चर्चा करत विशेष संवाद साधला. डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी सर्वच क्षेत्रांतील नेतृत्वावर भाष्य केलं. 'देशात खूप क्षमता आहे; पण विश्वासाचा अभाव चिंताजनक आहे. सर्वसामान्य माणसाच्या वैचारिकतेला सर्वसामान्य समजले जाऊ नये,' अशी अपेक्षा त्यांनी या वेळी व्यक्त केली. 'भारतात अर्थसंकल्पीय तुटीपेक्षा विश्वासाची तूट अधिक आहे. विश्वासाचा अभाव अधिक आहे. त्यामुळे देशातील विश्वासाची तूट कमी करण्याची गरज आहे.' असं मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केलं. 'विश्वास हा नेतृत्व आणि सहानुभूतीमधला धागा आहे. तुमच्या टीममधील लोकांमध्ये स्वतःबद्दल विश्वास पेरून आणि संबंधित व्यक्तींना समजून घेऊन तुमचं असाध्य काम साध्य करणं शक्य आहे.' असं मत लेखक रवि कांत यांनी मांडलं. म्हणूनच, भारतातल्या सर्व व्यावसायिक व्यवस्थापकांसाठी आवश्यक असा ज्ञानाचा ठेवा 'लीडिंग फ्रॉम द बॅक : असाध्य ते साध्य करा' या पुस्तकातून सहज उपलब्ध करण्यात आला आहे.

◆



# हस्तांतरण


## अस्मानभरारी...

‘मावळ शिक्षक प्रबोधन परिवार’आयोजित ‘दुर्गतीर्थ रायगड दर्शन’ कार्यक्रम नुकताच पार पडला. या कार्यक्रमाचं औचित्य साधून ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि महान कादंबरीकार विश्वास पाटील यांच्या ‘महासम्राट’ या कादंबरी मालिकेच्या तिसऱ्या खंडाच्या संहितेचं हस्तांतरण करण्यात आलं. ही कादंबरी मालिका शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित आहे. ‘अस्मानभरारी’ असं या तिसऱ्या खंडाचं शीर्षक आहे. विश्वास पाटील आणि लेखक-अभिनेते प्रवीण तरडे यांच्या हस्ते, मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल मेहता यांनी ही संहिता स्वीकारली. १५ नोव्हेंबर रोजी दुर्गतीर्थ रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र समाधिस्थानावर हा सोहळा पार पडला. ‘महासम्राट’ या कादंबरीचे पहिले दोन खंड (‘झंझावात’ आणि ‘रणखैंदळ’) मेहता पब्लिशिंग हाऊसनेच प्रकाशित केले आहेत. ‘अस्मानभरारी’ हा तिसरा खंड लवकरच वाचकांच्या भेटीस येत आहे.

◆

## नवी संहिता... नवा आशय...







**जी. बी. देशमुख**

मनाला साद घालणाऱ्या साध्या-सोप्या घटना आणि वैदर्भीय भाषेचा गोडवा असणारा जी. बी. देशमुख यांच्या अनोख्या गोष्टुल्यांचा संग्रह

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**TBC-35 Book No 1**






**रॉबिन कुक**


अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

लाखो लोकांना मारण्याची आखली घातक योजना... तिच्या तपासाची रंगलेली उत्कंठावर्धक कथा

**किंमत : ६५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पुस्तकाच्या पानांतून




## सामक्षा

**सुमेध वडावाला (रिसबूड)**

पृष्ठे : २४४
किंमत : ३६०

*आशयघन कथानक आणि आकर्षक कथनशैलीतील सुमेध रिसबूड यांच्या कथा दशकांच्या अंतराने पुन्हा वाचकांच्या भेटीस*

### आदिमाया

सकाळ आणि नंतर...

गजराची किरकिर सुरू झाली आणि त्याला थोपवून मी उठले; तत्काळ उठले. जागीच होते रात्रभर. संसाराची पन्नास वर्षं मनात भरून आली होती. त्यापूर्वीचेही कोकणातले दिवस- आई, आजी, घर, बहिणी असं

काहीकाही आठवत होतं. मी आता अडुसष्ट वर्षांची झाले. हे बहात्तर वर्षांचे. अजून तरुण आहेत. नको इतके तरुण आहेत, आणि मी तरुण असावं अशी त्यांची अपेक्षा आहे. रात्री जवळ येऊ घातले होते, तेव्हा मी म्हणालेही होते,

''नको वाटतं आता हे! आज तर नकोच!''

''का? उद्याच्या सेलिब्रेशनचं टेन्शन आलंय का?''

''ते कशाला येईल? अजित-वैजयंतीनीच आखलं आहे. तेच करणार आहेत सगळं. मुळात हे काही साजरं करावं हे माझ्या मनात नव्हतंच. पण लेकाने- सुनेने घाट घातला. त्यात तुमचा आग्रह. संसाराची पन्नास वर्षं कुणी पार करत नाही का? विशेष काय आहे त्यात?''

''विशेष हे आहे की एका नामांकित लेखिकेच्या संसाराची ही पन्नास वर्षं आहेत. पुस्तकाची पन्नाशी गेल्या महिन्यात झाली. ती तू प्रकाशकांनाही साजरी करू दिली नाहीस. आता ही संसाराची!'' असं लाडेलाडे वगैरे बोलत त्यांनी जवळिकीचा पुन्हा एकदा प्रयत्न केला होता. मी बधले नाही; तेव्हा ते रानटी झाले होते. मग मी शरण गेले होते. वर्षानुवर्षांची- पन्नास वर्षांचीच रीत! पण अलीकडे त्यांनी गुटख्याचं व्यसन लावून घेतलं आहे. गुटख्यावर सरकारने बंदी घालायचा निर्णय जाहीर केला, तेव्हापासून त्यांनी गुटखा खाणं सुरू केलं. हे असलं काही विपरीत करणं म्हणजे त्यांना जगावर विजय मिळवल्यासारखं वाटतं. आता ते कुठून कुठून चोरून- काळ्या बाजारातून गुटखा मिळवतात. चढ्या भावाने घेतात व खात राहतात. स्वत:वर लादून घेतलेली व्यसनं पूर्ण करतात. पण तोंडाचा तो- नको इतका सुगंधी वास मला रात्रभर सहन करावा लागतो, याचं त्यांना भान येत नाही. तशी गरजही वाटत नाही.

पूर्वी वाटली नव्हती, तर आता संसारपन्नाशी पूर्ण केल्यावर कशाला वाटावी?

तो वास सहन करत मी त्यांना देहशरण झाले.

पुढच्या रात्रभर सुखी संसाराची पन्नास वर्षं आणि त्यापूर्वीची गरिबी-कोकण असं बरंच काही आठवत राहिलं. मग हा गजरच झाला घड्याळाचा! हा गजरही वर्षानुवर्षांचा. हे एल.आय.सी.त होते. साधे क्लार्कच होते बरीच वर्षं. एकच खुर्ची होती कित्येक वर्षं. पण मिजास साहेबाच्या साहेबाची होती. तीही इंग्रजी साहेबाच्या साहेबाची. 'मुंबईतले रस्ते आता पहिल्यासारखे राहिले नाहीत' अशी नावं ठेवत ते धावायला जायचे. व्यायाम करायचे. एकही सकाळ चुकली नाही. काळानुरूप काही बदल झाले. लेंगापँट करताकरता आता

बर्म्युडा आली त्यांच्या कमरेभोवती. खाली बूटमोजेही आले. हा जामानिमा फक्त पळण्यापुरता. म्हणजे दिखाऊपणापुरता. घरी आल्यावर लेंगा तर नाहीच; पट्ट्यांची अंडरपँट चुकली नाही. वर उघडेबंब. यात कन्फर्टेबल नि फ्रेश वाटतं म्हणे. मसल्स वगैरे दाखवायचा— एक्झिबिट करायचा हा फुकटातला चान्स. आमचं हे तीन खोल्यांचं घर भाड्याचं- कॉमन गॅलरीचं आहे. रस्त्यालगत इमारत. आम्ही पहिल्या मजल्यावर. वरचा अख्खा मजला मालकांच्या ताब्यात, नि तळमजल्याला दुकानं. गेल्या चार-पाच वर्षांत आमच्या सगळ्या शेजाऱ्यांची मालकाने पैसे देऊन हकालपट्टी केली. हे म्हणाले, ''त्या सगळ्यांनी व्ही. आर.एस. घेतली.'' हे मात्र तिथेच राहिले. बधले नाहीत कुणाला. जुनं भाडं नि घर ऐसपैस. पण यांचं मन-भावना यांतलं काऽऽही ऐसपैस-प्रशस्त नाहीये. मनातही चाळ संस्कृती घट्ट बसून आहे. गुटखाआहारी झाले नि स्वाभाविकपणे सुपारीला विसरले, तरी ॲन्टिक म्हणून असेल, पण पानतंबाखूची मखमली-देखणी चंची अजूनही जपली-राखली आहे. तिची जागाही तीच ठेवलेली आहे. टीव्ही घरात घुसूनही बरीच वर्षं झाली. पूर्वी बाहेरच्या खोलीत- कोपऱ्यात रेडिओ असायचा. टीव्ही आला आणि रेडिओ निर्वासित झाला. घरभर उठाबशा व्हायच्या बिचाऱ्याच्या. पण त्या चंचीचं स्थान मात्र हिरावलं गेलं नाही. पूर्वी ती रेडिओच्या डोक्यावर असायची. आता टीव्हीच्या डोक्यावर मिऱ्या वाटते. अडकित्ता कसा देखणा पितळी- सोन्याचा वाटावा असा आहे. सुपारी कातरणारा हा अडकित्ता हे मला त्यांच्याच देखण्या-उग्र-भीतिदायक-तापदायक पौरुषाचं प्रतीक वाटत आलं आहे. किती सुपाऱ्या कापल्या-फोडल्या, तरी याचा देह त्याच्या धारेसह मजबूत-शाबूत आहे.

हे बहुधा पिढ्या न् पिढ्यांचं आणि घरोघरीचंही असावं!

आणि एक्झिबिट करायचं मात्र खास आमच्या म्हणजे यांच्या घराचं!

वापरायचा नसतो, तरी अडकित्ता चंचीबाहेर काढून असा तिरका उभा ठेवतात की दारी आलेल्या माणसाला त्याची- घराची मोहजरब वाटायलाच हवी. कौतुक वाटायलाच हवं.

जे अडकित्त्याचं, तेच स्वत:चं!

स्वत:ही गॅलरीत उभे राहतात. तासन्तास. उघडेबंब!

अजितला हे आवडत नसावं. त्याला या चाळ कल्चरचाच तिटकारा आहे. वैजयंती तर सरळ म्हणते,

''आय हेट दॅट मेन्टॅलिटी!''

अर्थात, त्यांना याचं- या म्हणण्याचं सोयरसुतक नाही. अजितच्या बोलण्याचंही नाही. परवा कधीतरी जातायेता म्हणाला,

''बाबा, असं उभं राहून राहून व्हेरिकोजव्हेन्स होतील!''

ते म्हणाले,

''हे उभं राहणं म्हणजे तिष्ठत राहणं नाहीय, हे जग मी न्याहाळत असतो. त्रास होतच असेल तर डोळ्यांना आणि हृदयाला. जे चांगलंचांगलं न्याहाळता येतं, ते न्याहाळण्यावरच थांबावं लागतं म्हणून!''

ही गॅलरीत उभं राहून खालच्या रस्त्यावरच्या पोरीबाळी न्याहाळण्याची वर्षानुवर्षांची सवय. ती आता एका रात्रीत- अजितच्या एकदाच्या टोकण्याने जाणार नाही. गुटख्याचं व्यसन एका रात्रीत लागू शकतं. पण एका रात्रीत ती सवय सोडता येत नाही.

आणि सोडायची तरी कशाला न्याहाळण्याची - खाण्याची सवय?

रिटायर्ड होऊनही पंधरा वर्षं झाली तरी व्यायाम, पळणं चुकलेलं नाही, आणि आपलं सगळं तब्येतीत करून घेणं चुकलं नाही. चहा गरम वाफा ओकणारा लागायचा; डबा चारी ठाव लागायचा, म्हणून त्यांची नोकरी होती, तोपर्यंत मी या गजरावर उठत आले, आणि नोकरी संपल्यावरही 'चहा गरम वाफेच्या'साठी म्हणून तशीच उठत आले.

या एवढ्या लांब-रुंद काळात अजितच्या शाळा-कॉलेजच्या वेळा बदलत राहिल्या. त्याची तंत्रंही सांभाळावी लागली.

पण हे सगळं घरच्या बाईनेच नको का करायला?

त्यातही, ती नोकरी न करणारी असेल तर तेच तर तिचं इतिकर्तव्य!

त्यातही ते मला 'आनंदी' समजतात, आणि स्वत:ला 'गोपाळ'. त्यांनीच घडवलं मला, असं ते समजतात. कोकणातल्या आडगावातून-दरिद्री कुटुंबातून आलेली- नव्हे आणलेली, फायनल पास वेडीबावळी मुलगी!

अजितबरोबर- त्याला शिकवताशिकवता मला जाणवलं; आपण शिकू शकू.

बाहेरून मॅट्रिकला बसायला त्यांनी मला परवानगी दिली. त्यांनी ही पुस्तकं आणून दिली. पेनातली शाई-रीफिल संपल्यावर ती आणायला त्यांनी पैसे दिले. आणि घरातलं सांभाळून खुशाल अभ्यास करायला त्यांनी परवानगीही दिली.

त्यांच्या चोखंदळपणाचा सगळा दिवस मी सांभाळल्यावर आणि त्यांच्या रसिकपणाच्या रात्री मी अंगावर घेतल्यावर नि त्यांनी माझ्या ओटीत रुजवलेल्या अजितच्या (हे नावही त्यांनीच ठेवलं) निकोप वाढीची मी इमानेइतबारे देखभाल केल्यावर आणखी काय हवं असणार होतं त्यांना?

हां! आता, त्यांनी आणलेल्या हिरव्याकंच पानांची देठं खुडून, विडा बनवून त्यांच्या मुखी घालण्याची रसिकता— हौस माझ्याजवळ नाही. ते नाही मी कधी केलं. पण त्याने डबडबलेलं तोंड मी रात्रंदिवस सहन केलं ना?

आपल्याला पोसणाऱ्या दारिद्र्यातून आपला उद्धार करणाऱ्या या नरपुंगवाला देहभेटीपूर्वी उर्फ ओरबडणीपूर्वी 'तोंड धुवा. ब्रश करून या' असं सांगायचं धाडसच कुठे होतं माझ्याजवळ?

आणि तेवढं सोडलं, तर काय वाईट होतं?

इंग्रजी-गणित घेऊन (पहिल्या फटक्यात) मॅट्रिक पास झाल्यावर त्यांनी मला त्यांच्या पसंतीचं पातळ आणलं होतं. नेसायला लावलं होतं. मला वाटलं होतं; आता हे कौतुक करणार आपलं. पहिल्या फटक्यात मुलगा दिल्याबद्दल नव्हतं केलं त्यांनी. पण पहिल्या फटक्यात मॅट्रिक झाल्याबद्दल कौतुक करणार आपलं. घरातलं सांभाळून वर्षभर अभ्यास केल्याबद्दल, त्यातही फर्स्ट क्लास मिळाल्याबद्दल कौतुक करणार आपलं. त्या कल्पनेनेच माझे डोळे भरून आले होते. ते काही बोलण्यापूर्वीच माझे डोळे भरून आले होते. तर म्हणाले होते,

''तृप्तीसुद्धा भोगता यावी लागते. 'पोटापाण्याला लागलो तरी पुष्कळ' असं मनात ठेवून तू माहेराहून इथे आलीस तेव्हा आपण 'मॅट्रिक' होऊ हे स्वप्नातही नसणार तुझ्या. ते प्रत्यक्षात घडलं म्हणून आता हसायचं की रडत बसायचं? अं?''

आता, वास्तवाची जाणीव झालेल्या माझ्या मनाचं स्वप्न होतं ते आणखी शिकण्याचं, ते जमलं असतं, तर काही बायका नोकरी करतात तसं नोकरी करण्याचं, इत्यादी. काही झाडांना उशिरा बहर येतो, म्हणून काय येणारे बहरच नाकारतात झाडं? अशी सकारात्मक विचारसरणी माझी. पण ती त्यांनी मातीमोल ठरवली. जसं स्वप्नं मातीमोल ठरवलं. नवं पातळ नेसल्यावर माझ्या सौंदर्याचं नाही; तर 'नेमकी कोणती, कोणत्या रंगाची साडी तुला खुलून दिसेल याचा परफेक्ट अंदाज मी कसा केला' याबद्दल ते स्वत:चं कौतुक करत राहिले.

स्वारी खुशीत आहे हे ओळखून मी हळूच खडा टाकला. पुढच्या

शिक्षणांचं- कॉलेजचं विचारलं. तर हे चवताळूनच गेले. स्वत:ला 'गोपाळ जोशी' म्हणवणाऱ्या या नरपुंगवाने आनंदीबाईंच्या थोबाडीत दिली नाही, हेच पुष्कळ!

नजरेतून ती त्यांनी दिलीच दिली.

नंतर... फार नंतर कधीतरी- फार उशिरा यांना प्रमोशन मिळालं. म्हणून यांनी घरातल्या घरात सत्यनारायण करायचं ठरवलं. मला घर साफ करायची ऑर्डर दिली. माळ्यापासून घर झाडून काढलं. धुळीचा वैताग नको म्हणून हे बाहेर कुठेतरी-मित्राकडे, नाहीतर इराण्याकडे जाऊन बसायचे. मी छाऽऽन झाडून घ्यायचे. माळ्यावरून जुनी ट्रंक काढली. एवढी जुनी, की उतरवताना आपटली गेली तर कुलूप शाबूत; पण कडीच निखळून पडली. झुरळं सैरावैरा पळाली. मला फार कौतुक वाटतं झुरळांचं. तेव्हाही वाटलं. स्वत:चं आणि वर्षानुवर्षांचं निवासस्थान असलं म्हणून काय झालं, ते हादरे देऊ लागतं तेव्हा खुशाल फारकत घेतात त्याच्यापासून ती. माणसांचं म्हणजे बाईमाणसांचं तसं नसतं. घरातून धक्के बसत राहिले, तरी निर्लज्जपणे-चामटपणे त्यालाच चिकटून राहतील.

झुरळांनी नवे निवारे शोधले, दिसली तशी दिसेनाशी झाली तेव्हा मी बॅग उघडली. आतले कागदही गंजले होते. अशा गंजल्या फायलीत मला यांचं कॉलेज लीव्हिंग सर्टिफिकेट मिळालं. आणखीही कागद मिळाले. गोपाळराव मॅट्रिक तर जेमतेमच पास झाले होते. पण हा अट्टल व्यायामपटू कॉलेजच्या पहिल्या वर्षीच्या आखाड्यातच चारी मुंड्या चीत झाला होता. मग हुशारी अशी की त्याने जीवनविमा पकडून स्वत:चं आयुष्य सुरक्षित करून घेतलं होतं.

गाड्याबरोबर नळ्याची यात्रा!

त्यांचं आयुष्य सुरक्षित झालं होतं, म्हणून माझंही सुरक्षित झालं होतं. नि 'ज्याला कुणीही जिंकून घेऊ शकत नाही' त्या अजितचंही!

पण सुरक्षितता— त्याही पुढे जाऊन म्हणायचं झालं तर संपन्नता, ऐश्वर्य म्हणजे पूर्ती नव्हे, तृप्ती नव्हे. हवेवर झुलायचं नि स्वत:च्या पायांवर उभं राहायचं थ्रिलिंग अनुभवायचं असेल तर पोटाशी मूल बांधून घेऊन डोंबारणीला दोरीवरून चालावं लागतं. सुरक्षिततेपासून काडीमोड घ्यावा लागतो. मी पुढे शिकले असते, तर संसाराची तारेवरची कसरत करायला मी समर्थच नाही, तर उत्सुकही होते. पण ते उत्सुक नव्हते.

कॉलेजात न गेल्यामुळे, कॉलेजची पायरी न चढल्यामुळे एका ॲथेलिटला— बॉडीबिल्डरला आपली बायको कॉलेजात गेली नि पासच काय; पण मार्कांतली चॅम्पियन झाली हे पाहायला कसं सहन होईल? असं सहन न होणं हे तर वैश्विक सत्य आहे. त्या काळी तरी तसं होतं. घेतानाच मुळी जड न होईल असा मोती पारखून घ्यायचा.

मग आता डेड-एन्डला येऊन ठेपलेली मी वाचू लागले. पुस्तकं, मासिकं नि रोजची वृत्तपत्रं. रमवावं लागलं नाही स्वत:ला. अंतर्बाह्य रमून गेले आपोआप. मग; कधीतरी अनावर झालं आणि लिहू लागले.

बायकोच्या शरीराच्या कणाकणावर नवरा आपला हक्क गाजवतो-बजावतो, उपभोगतो; त्या देहाची-वळणांची त्याला इत्थंभूत माहिती असते; तरी नवऱ्याला— आपल्या देहाच्या ताबेदाराला आपला देह उघडपणाने दाखवायला बायकोला लाज वाटते. (म्हणून तर बाईच्या नशिबी उभेलावणं आलं, आणि पुरुषाच्या नशिबी अंघोळीनंतर लावायला निऱ्या करून खुंटीवर सज्ज करून ठेवलेलं करवतकाठी धोतर.) मलाही माझ्या यच्चयावत जगण्याचे ते ताबेदार- साक्षीदार असूनही माझ्या जगण्याचे अंश दाखवणारं माझं लेखन त्यांना दाखवायची लाज वाटायची. धाडसच नाही व्हायचं, 'आता मी लिहू लागले' हे सांगायचं. लेख, ललितलेख, कथा! मासिकांतल्या लेखनाचे कधी काळी मनीऑर्डरने पैसे यायचे. तेही त्यांच्यापर्यंत गेलं नव्हतं. पण असा पैसा माझ्या हाती 'खुळखुळू' लागला होता. 'खुळखुळणारा' पैसा हा कधीच कुबेरधर्माचा नसतो, वाजणाऱ्या पैशाची जातकुळी 'चिल्लर'ची असते, हेही वैश्विक सत्य. चिल्लर असली तरी ती जोडताना, सांभाळताना मला आनंद वाटायचा. पण एक बोच आणि त्याहूनही भीती मनात असायची. आपल्या देहस्वामीला गृहस्वामीला न सांगता आपण अर्जन आणि संचय करत आहोत; याबद्दलची बोच- त्याहूनही भीती! आता मात्र, झाली आता बरीच वर्षं- पुस्तकाची विचारणा प्रकाशक पत्रातून करू लागलेत, तेव्हा तरी यांना सांगायला हवं, असं मी मनाशी ठरवून स्वत:ची तशी तयारी करत होते, तर हे एक दिवस ऑफिसातून आले, ते गजरा घेऊनच. तो त्यांनी मला माळलाबिळला नाही. जिथे रेडिओवर चंची होती; पानात बांधलेला तो गजरा तिथेच ठेवून म्हणाले,

''आज गजरा घाल अंबाड्यावर.''

मी अंबाडा घालत नव्हते. वेणी-शेपटा घालत होते. पण आज त्यांनी

गजरा आणला आहे आणि तो त्यांना अंबाड्यावर घालून हवा आहे, म्हणून गजऱ्यासाठी मी अंबाडा घातला. मग संध्याकाळचा गरम वाफा सोडणारा चहा त्यांना दिला. त्यांच्या फर्माइशीचं थालीपीठ करून त्यांना दिलं. त्यांना तसंच आवडतं म्हणून ताजं लोणी काढून त्यांना दिलं, आणि खाल्ल्या-प्याल्यावर त्यांनी रहस्यभेद केला. म्हणाले होते,

''ओळख बघू, आज का आणला मी गजरा?''

तेव्हा खरं म्हणजे फ्रीचा जमाना नव्हता. म्हणजे, संकल्पना अस्तित्वात होती. पण बोकाळलं नव्हतं असं फ्रीचं धोरण. पण माझी कल्पनाशक्ती लेखनाने तेज केली होती. बोलण्यात वापर करणं शक्य नव्हतं तरी माझा सेन्स ऑफ ह्यूमर तेज झाला होता. तंबाखू, सुपाऱ्यांवर फ्री मिळाला असेल आज. म्हणून आणला असाल तो गजरा, असं माझ्या मनात आलं होतं. पण बोलणं शक्य नव्हतं.

माझ्या गप्प राहण्याचा अर्थ त्यांनी 'हिचा मठ्ठपणा' असाच घेतला असावा. मी नुसती अर्थहीन-निरुद्देश हसले होते, त्याचा अर्थ त्यांनी पराभवाची कबुली असाच घेतला असावा. उदारपणे म्हणाले होते,

''तू लिहितेस ना, म्हणून! म्हणून आणला हा गजरा! कधीपास्नं हे?''

''झाले बरेच दिवस.'' खरं म्हणजे बरीच वर्षं होऊनही त्यांच्यासाठी मी माझ्यावर हे दिवस लादून घेतले होते,

''अस्सं, मग मला बोलली नाहीस कधी ते? अं? मी तुला ऑफिसातून चांगले कागद आणि कोरे कार्बनपेपरही आणून दिले नसते का?'' आयुष्यात पहिल्यांदा समजूतदारपणे हे म्हणाले होते,

''असू दे! हरकत नाही. यापुढे करता येईल. मला आज ऑफिसात पोंक्षे म्हणाला, म्हणून कळलं. त्याच्या बायकोने त्या कुठल्यातरी... त्या... काय बरं नाव? हं! पण याच महिन्याच्या त्या मासिकात तुझा एक लेख वाचलान्...''

'लेख नव्हे- कथा' हे मला सांगावंसं वाटत होतं.

''तो लेख- म्हणजे त्याच्यावरचं नाव तिने वाचलंन. म्हणाली : यशवंत गोगटे म्हणजे यशवंतभावजीच असणार. म्हणताना; पोंक्ष्याने आज मला आधी तुझं नाव काय ते विचारलंन. नि मग हा गौप्यस्फोट केलान्... मग म्हटलं गजरा न्यावाच.''

मला अगदी कृतकृत्य वगैरे वाटलं होतं. अजितच्या वेळेला त्यांनी मला

गजरा आणला होता. डोहाळेजेवणाच्या वेळी. चाळीतल्या सगळ्याच बायका-मुली जेवायला येणार होत्या. बायका-मुलींची यांना अगदी फारच हौस.

स्वयंपाकाला— आचारीकामालाही यांनी बायकाच बोलावल्या होत्या. आतबाहेर घोटाळत होते. मग खाली मार्केटात जाऊन ऐन वेळी ताजे गजरेही आणले होते. बायका-मुली, आचारणी-वाढपिणी यांना मोजून जे एकूण गजरे त्यांनी आणले होते, त्यांतला एक माझ्यासाठीचाही होता.

आणि त्यानंतरचा हा आजचा लेखिकापणाचा!

म्हणजे, जर आपण लेखिका होऊ शकलो नसतो, तर आपण या गजऱ्याच्या आज धनी झालो नसतो, या जाणिवेचा चरा माझ्या त्या कृतकृत्यतेवर उमटला होता.

तरी एकुणात मी फायद्यातच होते. कारण मॅट्रिकनंतर मी पुढल्या शिक्षणाचा मांडलेला प्रस्ताव किंवा अजितच्या पाठीवरच्या त्यांच्या ईप्सित मुलाच्या जन्माला मी दिलेला कणखर- यशस्वी नकार अथवा अशाच काही प्रसंगांत मी त्यांचा प्रचंड रोष पत्करला होता. खरं म्हणजे पचवला होता. तसा रोष मला या वेळी मुळीच सहन करावा लागला नव्हता, आणि माझ्या लेखनाला त्यांनी उदार मनाने हिरवा कंदील दाखवला होता.

अर्थात, मीही त्याची उतराई झाले होते. मानधन जोडत गेले होते, आणि रहस्यभेद झाल्यानंतर आलेल्या त्यांच्या वाढदिवसाला त्यांच्यासाठी शर्ट-पँटपीस आणून आनंदही वाढवला होता. पैन् पैचा काटेकार हिशोब ठेवणाऱ्या त्यांना तेव्हा या मानधनाचं कळलं होतं. म्हणाले होते,

''म्हंजे, मासिकवाले पैसेही देतात वर?''

''फार नाही. पण देतात कागद नि पोस्टेजच्या खर्चापुरते.''

तर त्यांनी बँकेत खातंच उघडून दिलं होतं या मानधनासाठी. यशोदा यशवंत गोगटे या नावाचं आयुष्यातलं पहिलं आणि आता अडुसष्टाव्या वर्षी वाटतं निश्चितच हे शेवटचं असं खातं. त्या खात्यावर यशवंत गोगट्यांचं दुसरं नाव असलं, तरी मला (म्हणजे तिला) बँकेच्या व्यवहारांचं जमायचं नाही, म्हणून त्याचं पासबुक नि चेकबुक त्यांनी त्यांच्याजवळच ठेवून दिलं होतं. बँकेचे व्यवहार करायची वेळच आली नाही फारशी. पण नित्यनियमित लेखनाच्या बळावर पहिलं-दुसरं करताकरता वीस-पंचवीस पुस्तकं यशोदेच्या नावावर 'यशवंत' झाली होती, तोपर्यंत ती रक्कम चांगलीच फुगली होती.

ते एवढे हिशोबी-व्यवहारी की त्यांनी ती रक्कम माझ्या सहीने काढून शेअर्स घेतले होते. फिक्स्ड डिपॉझिटमध्ये गुंतवले होते. नि पैसाच पैसा झाला होता. तो एक्झॅक्ट किती झाला आहे, याचा मला अंदाज नव्हता नि लागूही दिला नव्हता त्यांनी, तरी बरीच रक्कम होती ती. ''तुझा पैसा तो! आम्हाला- घराला काय करायचाय तो?'' अशी मिजासही ते बोलून दाखवायचे. कारणाशिवाय नि विषय निघाला नसतानाही बोलून दाखवायचे. तरी अजितच्या लग्नानंतर त्या दोघांनाही प्रशस्त ब्लॉक घ्यायचा होता, तेव्हा 'भांड्याला भांडं लागण्यापूर्वी दूर व्हा,' असं समजुतीने बोलत माझ्या नावावरचे काही लाख त्यांनी अजितला देऊन टाकले होते. वर समंजसपणे म्हणाले होते,

''मुलाचा संसार हा आईबापांचाच असतो. तुला आत्ता गरज आहे. तू न सांगता न मागता मी पैसा देणं यातच मजा आहे. बापाकडून पैसा घेताना तुला मुळीच लाज वाटायला नको. आणि तो परत करायचं टेन्शनही तू घेऊ नकोस! वैजयंतीलाही हे सांग तू!''

वैजयंतीला का नाही आपला सासरा देवदूत वाटणार?

ज्या सासऱ्याने आपल्या सासूला घडवलं म्हणजे घडवणं हाच ज्याचा स्थायिभाव आहे, त्या सासऱ्याने आपला संसार घडवायला काही लाख दिले, याचं कोण कौतुक तिला. आता त्यांच्या दर वाढदिवसाला तिच्याकडून प्रेझेंट असतंच त्यांना भलंमोठं.


माझा वाढदिवस या तिघांपैकी कुणालाही माहीत नाही.

आजचा, आमच्या संसाराचा पन्नासावा वाढदिवस त्यांना माहीत आहे. तो सेलिब्रेट करायचा त्यांनी घाट घातला आहे; कारण तो संसार यशवंत गोगट्यांचा आहे.

संसारातले असे अनेक अनुभव या माझ्या लेखनाच्या प्रेरणा असल्या, तरी हा घड्याळाचा गजर ही प्रत्येक दिवसाची प्रेरणा आहे. शिस्तीच्या टाइमटेबलची ती गुरूकिल्ली आहे.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## सांजवा

**सुमेध वडावाला**
**(रिसबूड)**

पृष्ठे : १५६
किंमत : २३०

*आशयघन कथानक आणि आकर्षक कथनशैलीतील सुमेध रिसबूड यांच्या कथा दशकांच्या अंतराने पुन्हा वाचकांच्या भेटीस*

''आनंदे कीर्तन, कथा करी घोष।
आवडीचा रस, प्रेमसुख।।
मज या आवडे, वैष्णवांचा संग।
येथें नाही लाग, कळिकाळाचा।।''

डाव्या हातात चिपळ्या आणि उजव्या हाती झांजा.

दोहोंची जुगलबंदी. शास्त्र्यांचा शुद्ध गायकीचा गळा. ओटीवर भक्तिमेळा. आरतीतल्या बुक्क्याची उधळण. शास्त्र्यांच्या चरणकमलांशी झटण्याची भाविकांची अहमहमिका.

आपसातली कुजबुज :

''गेल्या सप्ताभर शास्त्र्यांनी रामचरित लावले, तो बाजूच्या पाटावर साक्षात मारुतीराय एका पायाच्या खुरमांडीवर...''

''खरेच वाटते?''

''खरेच काय पुसतां? मीसुद्धा भुभु:कार ऐकिला.''

''तरी न्यावी सिद्धी, देवा।
हेचि वासना। हेचि वासना।।
रक्षूनिया सर्वा द्यावी! आम्हासी आज्ञा।
जाहले भजन, आम्ही नमितो चरणा। नमितो तव चरणा।।
वारुनिया विघ्ने देवा।
रक्षावे दीना।।''

निरोपाच्या आरतीवेळी शास्त्र्यांचे तिरळे ध्यान तबकात पडणाऱ्या खुर्द्यावर आणि कान भाविकांच्या कौतुकसुखाकडे...

शास्त्री म्हणजे पंचक्रोशीतले अवतारी पुरुष. कुठून उगवले, कुठे मावळणार, हे कुणास ठाऊक नाही. तरी वारकऱ्यांचे तुकाराम.धारकऱ्यांचे रामदास. साहित्य- मुमुक्षुंचे ज्ञानराज. संसारतापी शिणलेल्यांवर ज्योतिषशास्त्राच्या आधारे अचूक उतारा घालणारे वराहमिहिर... शास्त्रींच्या अंगी नाना कळा...

''शास्त्री, आता पुढला मुक्काम कोणत्या गावी?''

''का हो? वायुगतीचा मागोवा कशास घेता?''

''ते खरेच. पण कीर्तनश्रवणास यावयाचे झाले, तर त्या गावी मुक्कामाचे जाणे होईल.''

''दुसरा गाव कशाला मग? याच गावी मुक्काम असेल शास्त्र्यांचा.''

''याच गावी?''

''हो, अंता गोगट्याच्या ओटीवर असेल,'' कुणीतरी उत्तरले. फिस्सकन हसले. ते ऐकून शास्त्र्यांनी डोळे मिटले. म्हणाले,

''सब भूमी गोपाल की! त्याने दावावे, तिकडे आमचे पाऊल पडावे.''

मग उपरण्याने घाम पुसू लागले. खडीसाखर तोंडात टाकली. हाताने

झांजेची उगाचच एक लय धरली.

खालच्या ओटीवरच्या कोलाहलाने माईंस जाग आली. अंथरुणावर डोळे उघडले. बाजूस चाचपडले. नानांचे शरीर हातास लागले.

भव्य कपाळ. मिशांचा झुबका. रुंद, फुगीर छाती. छातीवरील केसांचे पडीक जंगल.

माई शहारल्या, उगीचच.

जिना उतरून त्या खाली आल्या. पाऊलवाटेवरून दिवे, एखादा विजेरीचा झोत, कंदील, गॅसबत्त्या पुढे सरकत होत्या. दगडांवर काठ्या ठणकावल्याचे आवाज येत होते.

माईंना वाटले,

दिव्यांचे संमेलन भरले. दिवली अवसेच्या कहाणीतल्यासारखे दिवे पिंपळपारी चालले.

स्वयंपाकघरात येऊन माईंनी शिंक्यातले मडके काढले. रवीने आदमुरे दही घुसळले. गंगाशास्त्र्यांना तसेच लागायचे. सांजेस निरशा, धारोष्ण दुधास विरजण लावायचे आणि मध्यरात्रीनंतर ते घुसळून द्यायचे.

घुसळण्याच्या आवाजाने शास्त्रींनी येरझारा थांबवला. माजघरातून स्वयंपाकघरात आले. माईंपाठी उभे राहिले. बोलण्याचे सुचेना. शेंडी तीनदा हासडली. गाठ मारली. शेवटी तिरळे डोळे वेळावीत विचारलेच,

''सूनबाई कुठायंत हो?''

''वायनाच्या पडवीस तिची पथारी,'' तोडण्यासाठी माई खड्या आवाजात म्हणाल्या. पण शास्त्र्यांनी टोकलेच,

''ऐकतो, ते खरे का?''

माईंनी झपकन वळून पाहिले.

देवघरातून आलेल्या लामणदिव्याच्या चुकार अंधूक पिवळाईतही त्यांना दिसले.

विचारताना शास्त्र्यांचे दोन्ही डोळे बारीक झाले आहेत. डावा हात मांडीवरून अस्वस्थपणे फिरतो आहे...

माईंना क्षणभर खंत वाटली. नंतर काहीसे भय आणि शास्त्र्यांबद्दल सूक्ष्म किळस...

''मस ठाऊक नाही काही,'' माई कोपाने म्हणाल्या.

''आज तुलसी आख्यान लावले होते.''

‘‘माडीवरून पडल्यापडल्या ऐकीत होत्ये,’’ माई तोडीत म्हणाल्या.

‘‘मज कैचे, रे, शिखासूत्र।
मज नाही कुळगोत्र।।
मज कैचे इष्टमित्र।
निष्कलंक मी असे।।’’ शास्त्री रंगात म्हणाले.

यांस म्हणावयाचे आहे तरी काय? ‘मज नाही कुळगोत्र?’ असे गूढार्थाने कोड्यात बोलतात, ते काही सुचवावयाचे आहे, म्हणून? की शुद्ध, सत्य योगायोग केवळ?

माईंनी चक्रावून शास्त्र्यांकडे पाहिले.

पंचपात्रीस आतून लागलेला लोण्याचा चिकटा जिभेने चाटून, मडक्यातून पंचपात्रीत ते पुन्हा ताक ओतत होते. ओतताना म्हणाले,

‘‘आख्यानास एकच गालबोट लागले.’’

‘‘कसले?’’

‘‘केशव गोगट्यास तापसर आली, म्हणून त्याने दामूअण्णा जोश्यांच्या मुलास साथीस धाडले.’’

‘‘साथ मिळाली, कीर्तन फत्ते झाले, हे महत्त्वाचे.’’

‘‘परंतु बोटांत सराईतपणा नव्हता. नवखेपणा घडीघडी जाणवत होता.’’

‘‘चालायचेच. ‘जुन्याचे स्थान नव्याने घ्यावे’ ही जगरहाटी आपणच कीर्तनात सांगत असता ना?’’

‘‘ते नव्हते म्हणावयाचे मस...’’

‘‘मऽऽग?’’ माईंनी त्रासून विचारले. शास्त्र्यांस काय म्हणावयाचे होते, हे त्यांना ज्ञात होते.

‘‘सूनबाईस आजचे दिवस साथीस बसविली असतीत, तर? पेटीवरला तिचा अधिकार आमच्या भ्रमंतीत आम्ही घरोघरी ऐकून आहोत. म्हणूनच पुकारीत होतो.’’

शास्त्रींच्या चेहऱ्यावर पुन्हा काकभाव होते. मिश्यांच्या झुबक्यात अडकलेले लोणी, ताकातल्या म्हाताऱ्या जिभेने तोंडात ओढीत होते.

माईंना पुन्हा किळस वाटली. म्हणाल्या,

‘‘शास्त्री, दामल्यांच्या घराशी तुमचा फार वर्सांचा ऋणानुबंध...’’

शास्त्री खुशीने हसले.

''साथीसच काय, पण कीर्तनश्रवणासही बाईने ओटीवर यायचे नाहीं, माजघरात दाराआड बसायचे, ही शिस्त तुम्हास ठाऊक आहे,'' माई आवंढा गिळीत पुढे म्हणाल्या, ''त्यातून सूनबाई पांढऱ्या कपाळाची. गंप्यास जाऊन सहा मैनेही लोटले नाहीत.''

''आता काळ बदलला. जुन्या रिवाजांचे स्थान नव्या सुधारणांनी घेतले,''

शास्त्री फक्कड हसत म्हणाले.

''लाल आलवणाच्या बासनात तिच्या देहाची जुडी न बांधता नित्याच्या नऊवाऱ्या नेसण्यास देत आहोत, इथवर काळाचे नवेपण आम्ही स्वीकारले, शास्त्री.''

''असो दोष वरपांगी।
किंवा कळा चंगी भंगी।।
धरू शुद्धी अंतरंगी।
नाचू कीर्तनाचे रंगी।।

गळ्यात तुळशीमाळ, भाळी बुक्का ल्याला की, माई, कीर्तनात दुजाभाव नाही. हीनदीनत्व वा थोरशिरजोरपण यांचे आपपरत्व नाही, हा कीर्तनाचा नियम... तुम्ही सूनबाईंस साथीस पाठवावयास हवे होतेत आज,'' शास्त्री मखलाशीने म्हणाले. आरतीत मिळालेला चवल्या - पावल्यांचा खुर्दा डाव्या हाताने मोजू लागले.

तिकडे पाहून माई म्हणाल्या,

''शास्त्री, तुम्ही नियमांचे जनक. पालकत्वही तेवढ्याच कसोशीने पाळतो आपण?''

''म्हणजे?'' डाव्या हातातली नाणी खणखणवीत शास्त्रींनी विचारले.

''कथा करोनिया द्रव्य देती घेती।
तया अधोगति नरकवास।।
राख कुंभपाक भोगिती यातना।
न ये नारायणा करुणा त्यांची।।''

शास्त्र्यांचे हात थबकले. पावली जमिनीवर घरंगळली. चोरट्या, तिरळ्या नजरेने त्यांनी माईंकडे पाहिले. मग हसून म्हणाले,

‘‘बऱ्याच हुश्शार झालात!’’

‘‘हेही काळाचे देणे,’’ माई निरभिमानाने म्हणाल्या. उठल्या. पंचपात्री विसळली. मडक्यात पाणी घालून मोरीशी ठेवले. हातातली चिमणी ओंजळीच्या आवरणात धरून माडीकडे जाऊ लागल्या,

‘‘जात्ये. हाथरुणावर बसून राहत्ये. पहाटेस प्रहरही उरला नाही आता...’’

‘‘मूळ प्रश्न तसाच ठेवता. चांगल्याच कुशल आहात.’’ शास्त्री म्हणाले. उठले. उपरणे झटकताना तिरळे डोळे पुन्हा बारीक झाले.

‘‘कोणता मूळ प्रश्न?’’ माईंनी नाइलाजाने विचारले.

‘‘ऐकतो, ते खरे?’’ शास्त्री माईंकडे तिरळ्या; पण एकटक नजरेने पाहत होते.

माईंस असह्य झाले. उसन्या अवसानाने विचारले,

‘‘हरदासाची कथा मूळपदी... काय ऐकताहात एवढे? आणि कोणाविषेयी?’’ आणि लटपटत्या पायांना नेटाने सावरीत जिन्यावर पाऊल टाकले.

गंगाशास्त्र्यांबरोबर पुढचे बोलणे कसेही करून त्यांस टाळावयाचे होते.

अतिथीचा आब राखून शास्त्री ओटीवर निचळ बसले असते, तर ताक पिताना नमूची पत्रिका गंगाशास्त्र्यांपुढे सरकावून माईंना विचारायचे होते,

‘कुलाला कलंक लावणारेच ग्रह करंटीच्या कुंडलीत पडले आहेत काय?’

शास्त्र्यांनी थातूमातूर उत्तर देण्याआधी त्यांना ठणकावायचे होते,

‘मग लगीन जमविताना गंप्याशी छत्तीस गुण कसे जुळविलेत?’

पण त्या संधीचे साधण्यापूर्वीच शास्त्रींनी चाल केली होती. माईंना बचावाचा पवित्रा घेताना मेटाकुटीस आणले होते.

‘‘मरो. जे नशिबी असेल, ते भोगेल!’’ माई उद्वेगाने स्वत:शी पुटपुटल्या. मुसमुसत अंथरुणावर पडल्या.

सकाळ होती.

उन्हाचे कवडसे वाडीभर झुलत होते.

माडांच्या बुंध्यांतून शिंपणाचे पाणी फुटलेल्या धरणाप्रमाणे लोंढ्याने खदखदत होते. तुषारांच्या फवारणीने कुशीतल्या लाजाळू मिटून माना टाकत होत्या. पेरूवर वस्तीला राहिलेला चुकार रावा नानांच्या पायरवाने हवेत सुळकन घुसून नाहीसा झाला होता. नाना वाडीत फिरत होते. आणखी पुढे आले, तो विहिरीच्या मोटेपाशी डोळ्यांवर झापडे मिरवीत बैलजोडी गरगरत होती.

नाना मोटेपाशी थांबले. वाटले —

आपल्याही डोळ्यांवर, कानांवर थोडक्या दिवसांनी अशीच झापडे बांधावी लागतील. जनप्रवादांच्या मोटेला असेच गरगरावे लागेल. जनरिवाजांचे, प्रायश्चित्तांचे आसूड मुकेपणाने सोसावे लागतील. निंदा गिळावी लागेल.

नानांच्या डोळ्यांपुढे काळेकुट्ट चित्र आले. पाठच्या अंगणात धप्पकन आवाज आला, म्हणून त्यांनी वळून पाहिले. कोपऱ्याशी आले.

फणशीखाली फणस फडला होता. चारखंड उकलून रसरसलेले पिवळेधम्मक गरे डोकावत होते.

नानांनी फणस उचलला. घरात आले.

ओटीवर खडावा नव्हत्या. खुंटीस झोळी नव्हती. पगडी आणि सदराही नव्हता. भिंतीशी वळकटी नव्हती. त्या जागी असोल्या नारळांची पाच सुकडे आणि टोपलाभर ओली रेशमी पोफळे होती.

वाडीत बाहेर पडताना मघाशी आपल्या हे लक्षात कसे आले नव्हते? नानांना वाटले... त्यांनी माईंना पुकारले,

''अहोऽऽ''

क्षणभर तिष्ठत उभे राहिले, प्रतिसाद आला नाही, तेव्हा आणखी मोठ्याने पुकारले, ''गंप्याच्या आई ऽऽ''

''काय झाले? क्षणाचीही उसंत नाही. कसली रानफाटी आणून टाकलीता, तीही मेली डोळे सोलणारी!'' धुराने चुरचुरणाऱ्या डोळ्यांना पदराने टिपीत बाहेर येताना माईंनी विचारले.

''मुक्काम हलला, वाटते?'' वळकटीच्या रिकाम्या जागेवरील पोफळे, सुकडे पाहत नाना म्हणाले.

''कोणाचा?'' लक्षात येऊनही माईंनी विचारले.

''हरिभक्तपरायण गंगाशास्त्री यांचा?'' नाना उत्तरले.

''भल्या पहाटेसच,'' हवेत हात झिडकारीत माई म्हणाल्या.

''आणि सूनबाई नमू?'' वायनाच्या पडवीकडे पाहत नानांनी विचारले.

''त्यांचा हात धरून गावदौऱ्यावर गेली,'' माई म्हणाल्या. कपाळी आठ्या चढवीत स्वयंपाकघराकडे वळल्या.

''तोंड संभाळाऽऽ!'' नाना तारस्वरात खेकसले.

संध्याकाळ होती.

''सूनबाई कुठायत?'' ओटीच्या उंबऱ्यातूनच नानांनी विचारले.

''उंबऱ्यावरचे ना नर, ना पशू होऊ नका. आत तरी धड या किंवा पूर्ण बाहेरून विचारा,'' माई शांतपणे म्हणाल्या.

''बोला, आता कुठे गेल्या त्या?'' आत येऊन माच्याखाली वहाणा सरकावीत नानांनी विचारले. टोपी काढून खुंटीस लावली.

''मसणात गेली,'' वातींची बोटे फिरवीत माई माच्यावरून उत्तरल्या.

''कोणास पोचवायला?'' नानांनी सणकून विचारले.

''आमची इज्जत आधीच पोचवून झाली. आता गेली ती करंट्या कपाळावर नक्षत्रे गोंदवून घ्यायला.''

''अशा तिनसांजेची बरी सोडलीत तुम्ही?''

''मी काही भालदार - चोपदार नाही, की राखणदार नाही.''

''राखण केली असतीत, तर हा प्रसंग येता ना,'' नाना हळू आवाजात म्हणाले.

''मस कर्तव्ये शिकवू नका. माझी नजर ओटीवरून तांबुडमाळापावत नि पाठल्या पडवीतून वाडीपावत; एवढीच. तुम्ही मात्र गावभर शिमग्याच्या बोंबा मारीत बारमास फिरत असता, ते राखण तुम्ही करायची होतीत. मी नव्हे!''

''बस बस बस! क्रोधागारात जाऊ नका. तिळपापड करून घेऊ नका,'' नाना हसत म्हणाले.

''हसताय काय फिदीफिदी? गंप्याच्या तेराव्यास बजावीत होत्ये, त्या कारटीस माहेरी धाडा, म्हणून!''

''माहेरास खायचे काय तिने? शेणगोळे?''

''ते तिने इथेही खाल्ले. पैला माझा लेक खाल्ला. तदनंतर शेणच खाऊन आमच्या अब्रूवर घाव घातला. अजून निस्तरा. बोभाटा होण्याआधी कारटीस पंढरपुरी तसल्या आश्रमात सोडा,'' माई हळू आवाजात म्हणाल्या.

''आणि जगास काय सांगू?''

''परागंदा! बारा वर्सं वाट पाहून श्राद्ध घालून टाकू,'' माई उत्साहाने म्हणाल्या.

''तत्पूर्वी माझे श्राद्ध घालून टाका!''

''आत्ताच घालत्ये... नाहीतरी फारा वर्सांपूर्वी बोहोल्यावर उभी राह्यल्ये, तेव्हाच मनी फिके कुंकू होते. केव्हाच पुसले जाईल; मग आयुष्यभराचा सोवळेपणा. तिकडे विषमज्वराच्या शय्येवरून उठून लग्नानंतर पुन्हा झोपला होतात, तेव्हा हळदीच्या हातांनी मातीच्या घड्या कपाळी घालीत बसणेचे

माझ्या कपाळी लिहिले होते, ते याद आहे ना?'' वाती वळण्याचे थोपवून माईंनी तेखाने विचारले.

''तसेच झाले असते, तर? कपाळ पांढरे झाले असते, तर? काय केली असतीत उभी हयात?'' नानांनी निर्विकारपणे विचारले.

''तुमच्या कै. गं. भा. मातोश्रींनी केले, तेच. त्यांनी दामल्यांची खरकटी खरवडली. चुली फुंकल्या. मी हातात पोळपाटलाटणे घेऊन मुंबै गाठली असती. समजले?'' माईंनी ठणकावले.

''तोंड संभाळा. दामल्यांचे घर म्हंजे कुणी काही त्रयस्थ नव्हेत. सासरी जिथे दिली, तेच स्त्रीच्या आयुष्याचे माहेर. याच बेताने सूनबाईसही माहेरास धाडली नव्हती... आणि मातोश्रींनी चुली फुंकल्या, त्या तिच्याच हक्काच्या घरी. तुम्ही मात्र पाय लावून मुंबैस पळाला असतात, ते उकिरडे फुंकायला.''

''तेही तुमच्या सुनेने फुंकले,'' माई म्हणाल्या.

''गंप्याच्या आई, सुचले शब्द बोलू नका. आता वयाने पिकलात, तो अधिकाधिक चळ लागू देऊ नका.''

''छान छान... माझ्या चळिष्टपणाचे सांगताहात, तेव्हा स्वत:स विसरताहात!'' माई म्हणाल्या. थांबल्या. बोटांची कणा रांगोळी फुंकून टाकली. आक्रमक स्वर बदलला. हळुवारपणे म्हणाल्या, ''परवांची वटसावित्री पुजली, ती चाळसावी होती. भलाबुरा संसार झाला, तरी वडास सूतगुंड्यांचे फेरे देताना मनास तिकडलीच याद होती, जन्मोजन्मीची आस होती. झेपत नाही, तरी निर्जळी उपास करते, तो मनात हाच हेतू पकडून... हे सारे पाहताहात, तरी विचारताहात, कपाळ पांढरे झाले असते तर?'' माईंचे डोळे डबडबले. घशात आवंढा दाटला.

''तसे नव्हते मस विचारायचे. पुसण्याचा हेतू दुसराच होता, गंप्याचे आई...''

''आणखी कुठला हेतू?''

''विचारू? त्रागा नाही करून घेणार?''

''कशापायी? आजवर घेतला कधी करून?''

नाना हसले. सदरा काढीत माईंच्या जवळ आले. लहान आवाजात म्हणाले,

''कपाळ पांढरे झाले असते, तर या सुडौल देहाचे, या केवड्याच्या कांतीचे, या केशकलापाचे, या मुखचंद्राचे, या उभ्या अमृतघटी देहाचे काय झाले असते?... पोटाच्या भुकेची आग पाण्याने विझते. पण... पण...''

माई थरथरल्या. मोहोरल्या. आयुष्यातल्या सुखाने, तृप्तीने त्या स्मृतीने शहारल्या. नानांच्या तुकतुकीत चेहऱ्याकडे, उघड्या पिळदार शरीराकडे पाहण्याचेही धारिष्ट्य झाले नाही. विषमज्वराने खिळखिळ्या झालेल्या हातांनी गळ्यात मंगळसूत्र बांधले होते. तेव्हा मुरुडच काय, मांडवाबाहेर गेल्या गेल्या पंचक्रोशीतल्या दोहो बाजूंच्या वऱ्हाडी मंडळींनी अप्पांच्या तोंडावर थुंकीच्या पिचकाऱ्या टाकल्या होत्या,

''लेक जड झाली होती, तर समुद्र होता ना एवढा!''

''नाही तर कड्यावरच्या गणपतीस साक्ष ठेवून कडेलोट तरी करायचा होता लेकीचा!''

- आणि त्या... त्याच देहाने आपल्याला आयुष्यातल्या यच्चयावत सुखाने मढवून टाकले. दूर गोंडाच्या माळाशी पौर्णिमेचा चंद्र पार तळाशी उतरेपर्यंत, शुक्रतारा चमकू लागेपर्यंत, पाठची प्राजक्ती पांढरा साज भुईच्या गळ्यास चढवेपर्यंत, अनावर पान्ह्यास लुचण्यास्तव पाडसास सोडावे, म्हणून दावणीभोवती फिरून गाईंनी हंबरण्याचा गजर करेपर्यंत... रात्ररात्र माडीवर जागेपणात जायची, पण तृप्तीने ओथंबून. निद्रेपेक्षा निद्रानाशातले सुख अधिक, हे नानांनी सिद्ध केले. सिद्ध करीत राहिले. किती दिवस? किती वर्षे? की आजतागायत?

माईंना बोलणे सुचेना. वळलेल्या वाती त्यांनी टिनाच्या डबीत दाबून भरल्या. उठल्या, खाली मानेने त्या स्वयंपाकघरात जाऊ लागल्या. म्हणाल्या,

''जात्ये. सांजवात लावत्ये.''

''थांबा. सांगून जा,'' पोलादी बाहू दारात पसरून नानांनी उंबऱ्यात अडविले.


माईंचा नाइलाज झाला. म्हणाल्या,

''सांगत्ये. दुनिया हसली, तरी अप्पांची भिस्त फिरस्त्या गंगाशास्त्र्यांवर. 'दामलीण काकूंचा लेक मरू घातला, तरी दोरी बळकट आहे, त्यास लेकीचे आयुष्य बांधा. दैव बदलता येत नाही, होणारे चुकत नाही हे शास्त्र्यांनीच कुंडलीवरून सांगितले.''

''पटले मग ते?'' नानांनी विचारले.

''चाळीस वर्सं गेली. तेवढ्यात पुन्हा तिकडे साधा ज्वरही नाही. सुंठीचा वळसा नाही. म्हणजे 'पटले' असेच म्हणावयास हवे,'' काहीशा लटकेपणी माई म्हणाल्या.

# पुस्तकाच्या पानांतून




## विरह्वास

**सुमेध वडावाला (रिसबूड)**

पृष्ठे : २०४
किंमत : ३००

*आशयघन कथानक आणि आकर्षक कथनशैलीतील सुमेध रिसबूड यांच्या कथा दशकांच्या अंतराने पुन्हा वाचकांच्या भेटीस*

**त्रि'काळ'**

सकाळ

कधीतरी सागर आला. अरविंद त्याला 'आमचा गुहागरचा समुद्र' म्हणतो. जिथे आम्हा तिघांचं बालपण गेलं. सागरची वृत्ती धीरगंभीर आहे. अरविंदाच्या बरोबर

विरुद्ध. सारा वडवानल पोटात साठवून असूनही, गर्जत असूनही बिचाऱ्याने किनाऱ्याच्या मर्यादा ओलांडल्या नाहीत. आता या आजारपणात - शेवटच्या आजारपणात मला खूप वाईट वाटतं त्याचं. अरविंदालाही वाटत असावं. आमचं घर-संसार रंगला. सागर हयातभर वनवासींच्यात काम करत राहिला. आज सत्तरीतही घरघर फिरणं सुटलं नाही. आमच्याकडे येतो तो मला भेटायला. गुहागरला आमची तीन घरं, लागोपाठची. एका ओळीतली मागची आंगणी, त्यांच्या किनाऱ्याला सोनटक्क्यांचं भरगच्च कुंपण. त्याच्या मागे नारळांच्या बागा तिन्ही घरांच्या, त्यांच्या मागे समुद्र.

'घरं वेगळी असली आपली, तरी आपला समुद्र एकच आहे. कशी मजा आहे नाही?' कॉलेजात गेल्यावर सागर म्हणाला होता. नि तेव्हापासूनच मिशा राखून असलेला अरविंद गडगडाटी हसून म्हणाला होता,

'जगातल्या बऱ्याच जणांचा समुद्र एकच असतो आणि आभाळ तर सर्वांचं एक असतं. भौगोलिक वा वैज्ञानिक सत्यांत कसली आलीय मजाबिजा?'

एकाचं वाङ्मय, दुसऱ्याचं विज्ञान. एकाची भावुकता, दुसऱ्याचा रोखठोक कारभार. 'भाग्यवती... लग्न करणारेस की नाही माझ्याशी? का पळवून नेऊ? तुझ्या घरच्यांनी विरोध केला तर तुला घोड्यावरून नेईनच. पण घरच्यांची धिंड गाढवावरून काढीन सांगून ठेवतो.' असं विचारण्याइतका रोखठोक कारभार.

कुठल्या कुठल्या आठवणी, कधी उफाळून येतात. कधी काऽऽही आठवत नाही. ब्लँक होऊन जाते या बेडवर. डॉक्टर म्हणतात, 'पार्शिअल डिमेन्शिया.' विस्मरणाचे झटके. तरी सागरच्या साऱ्या आठवणी जशा काही 'शिंपलाबंद' आहेत. सारे मोती. सौभाग्याचे काळे मणी अरविंदाचे, आठवणींचे ऐश्वर्यमोती सागरचे, त्रास होतो त्या आठवणींचा; त्यात भर या कॅन्सरच्या वेदनांची. पार्शिअल डिमेन्शियात पोटातल्या कळांचा, वेदनांचा मात्र विसर पडत नाही.

खरं म्हणजे कोणत्याच 'काळीजकळां'चा, 'हृदयवेदनां'चा विसर पडत नाही. अशा वेदनांचा खुलेपणाने उच्चार करता येऊ नये यांतली वेदना अधिक जहरी आहे, हा विचार मनात आला आणि डोळ्यांचे डोह झाले. अरविंदाचं माझ्याकडे नेमकं लक्ष होतं. कधी येऊन बेडजवळ बसला होता, कळलं नव्हतं. कपाळावर त्याची लांबसडक बोटं पसरली. बोटांना थरथर. मनात मोठ्ठी भीती.

''काय झालं आता?'' अरविंदाच्या मिशीतून फुललेला खर्जातला स्वर.

''आय फीअर, तुला पार्किन्सोनिझम तर होणार नाही ना? तुझा हात

हलतोय विचित्र.

‘‘स्वत: मरू घातलेली असताना नवऱ्याची चिंता कशाला हवी? मला इथे काही झालं तर तिथे वर तुझ्या आत्म्याला शांती मिळणार नाही हे माझ्या रक्तातल्या थेंबाथेंबाला माहीत आहे,’’ नेहमीच्या निधडेपणाने अरविंद म्हणाला,

‘‘आणि तुला हे माहीत हवं की तू हसलीबिसली नाहीस तर खैर नाही. तुझ्या शरीरातले ‘खेकडे’ माझं ऐकतातच. त्यांना बाहेर यायला सांगीन.’’

‘‘आले समजा तर काय करशील?’’

‘‘सागरच्या अंगावर सोडीन त्यांना, खेकड्यांना आवडतो ‘गुहागरचा समुद्र.’’’

‘‘काहीतरी बोलू नकोस.’’

‘‘मग तूही काहीतरी बोलू नकोस. तूच मला पार्किन्सोनिझम लावलास आधी.’’

‘‘अरे... तुझी बोटं थरथरतायंत ना,’’ त्याच्या बोटांवर हात ठेवून म्हणाले, ‘‘आणि तुझ्या आईलाही कंपवात होता ना म्हणून म्हणाले मी.’’

‘‘असेल, तिने त्याला भीक घातली नव्हती आणि ती दीर्घायुषी होती. तिच्याकडून अनुवंश यायचाच असेल तर दीर्घायुष्याचा येईल. ते का नाही मनात येत तुझ्या भाग्यवती? अं?’’

वा रे वा या दीर्घायुष्यवाल्याची! संडास-बाथरूमात कधी अधिक वेळ लागला तर... आत्ता या आजारपणात नव्हे, तर ऐन तारुण्यातही कधी अधिक वेळ लागला तर हवालदिल होणारा, बाहेरून दार ठोठावणारा तू... अरे, तुला दीर्घायुष्य लाभलं तर कसा राहशील तू माझ्याशिवाय? माझ्या जाण्याचं, माझ्या वेदनांचं दु:ख नाहीच मला. झाली पाच सात वर्षं-जेव्हा लिव्हर कॅन्सर डिटेक्ट झाला होता. किमोथेरपीचे कल्लोळ पचवले होते तेव्हाच तर शक्यता गृहीत धरली होती या ‘सेकन्डरी’ची. तू म्हणतोस तो हा खेकडा-स्प्रेड झालेला, त्याला डॉक्टर म्हणतात ‘मेटॅस्टॅसिस.’ इन्टेस्टाइन नि आणखी कुठेकुठे त्याचे अदृश्य तंतू फैलावत आहेत त्याची मला फिकीर नाही. डॉक्टर म्हणाले होते, पॉलिएटिव्ह ट्रीटमेन्टवर भरवसा ठेवू या, याचा अर्थ का मला कळत नाही? पेनकिलर्स देत राहणं म्हणजे किलिंग प्रोसेस थोडी सोपी करणं एवढंच नाही का? या कश्शाची मला चिंता नाही. चिंता आहे ती तुझीच, माझ्यानंतर तुझ्या

असण्याची. आणि तू बोलतो आहेस ते स्वत:च्या दीर्घायुष्याचं! वेडा कुठला! इथवर मला माझे विचार कळत होते. नंतर पुढचं काही कळेनासं झालं. ब्लँक झाले एकाएकी. भान आलं तेव्हा तोंडी उच्चार होता तो मनातल्या विचाराचा.

'वेडा कुठला! वेडा कुठला! वेडा कुठला! वेडा कुठला!' मी म्हणाले. म्हणजे मी सतत तेच तेच म्हणत होते. विचित्र रीपिटिशन्स! स्वत:चा तो ध्वनी-प्रतिध्वनींप्रमाणेचा उच्चार ऐकताना मी ओशाळून गेले. स्वत:ला प्रयत्नपूर्वक थांबवलं. डोळे उघडले. कष्टाने उघडले. समोर दोघेही बसलेले होते- सागर आणि अरविंद. म्हणाले,

''सागर, तू कधी आलास? आणि किती थकला आहेस तू रे?''

''थकलो आहे ती तुझी अवस्था पाहून भाग्यवती, आणि मी सकाळी आलो ते विसरून गेलीस ना? 'दोन तास तरी झोपून घे' असा आल्याआल्या आदेश तूच मला दिला होतास ना? मी चार तास झोपलो होतो. आत्ता अकरा वाजले. आणि तू विचारते आहेस, कधी आलास तू? काय हे?''

मी ओशाळून हसले, तशी स्वत:च्या खर्जातल्या आवाजात माझ्या शैलीची नक्कल करत अरविंद म्हणाला,

''वेडी कुठली! वेडी कुठली! वेडी कुठली! वेडी कुठली!'' आणि आम्ही तिघंही हसू लागलो. ती लकेर जिवंत ठेवून अरविंद उठला. आत गेला. सागर माझ्याकडे पाहत राहिला. मी अवघडून गेले. माझ्या डोक्यावरून त्याने हात फिरवला. डोक्याचा पुरता गोटा करून घेतलेला. ही आयडिया अरविंदचीच! कुणीतरी 'शीर्षधारे'चं सांगितलं. कपाळावर पाण्याची धार धरायची. मला 'रिलीफ' वाटला. अरविंदने मोठ्या अभिषेकपात्राची योजना केली. 'फॅब्रिकेशन'चा व्यवसाय त्याचा! 'डेथ' ॲडजेस्टेबल नसलं, तरी हा 'डेथबेड' ॲडजेस्टेबल आहे. लिव्हर फिरवून पायांकडून बेड उंचावला, डोक्याकडे उतार दिला की झालं. डोक्याखाली प्लास्टिकचं मोठं सूप सरकवलं की झालं. सुपाला कोपऱ्यात भोक पाडलं आहे. डोक्यावर मोठं 'अभिषेकपात्र' धरणारा स्टॅण्ड त्याने बनवून घेतला आहे. पात्र सुरू केलं की कपाळावर 'संततधार' धरली जाते. जिथे सौभाग्यदर्शक कुंकू रेखत आले, तिथे अरविंदची ही संततधार पडत राहते. पाण्याचा असा निचरा होऊन जातो की बेडवरच्या पांघरुणाला त्याचा निसटता स्पर्शही होत नाही. अशी व्यवस्था करून घेतल्यावर माझं मन वळवण्याचाही खटाटोप केला या पहाडी पुरुषाने! ब्युटी पार्लरच्या मालकिणीला बोलावून डोकं

‘शेव्ह’ करून घेतलं. आता तोच नियमितपणे शेव्ह करून घेतो, घरीच. त्या अभिषेकासाठी डोक्याचा असा फणस झाला आहे. त्यावरून सागरची बोटं फिरत आहेत. म्हणाला,

‘‘भाग्यवती, मला माझी मुंज आठवली बघ! गोटा करायला मी तयार नव्हतो. ‘वाटाणे मारणार’ असं अरविंद म्हणाला होता.’’

‘‘मी तुझ्या बाजूने उभी राहिले होते. अरविंदने वाटाणे मारले तर त्याच्या डोक्यावर मी ‘सागरगोटे’ मारीन असं बजावलं होतं. तुझी समजूत काढली होती. तुला गोटा करायला लावला होता.’’

‘‘त्याची वसुली म्हणून माझ्या खरखरीत डोक्यावरून केव्हाही हात फिरवण्याचा हक्क तू बजावत होतीस.’’

‘‘त्याची परतफेड करतो आहेस ना आता तू? दुष्ट कुठला!’’

‘‘त्याला कशाला दुष्ट म्हणतेस? मला म्हण. सागरला परतफेड करता यावी म्हणून मीच तुझा गोटा करून घेतला नाही का?’’ स्वयंपाकघरातून येत अरविंद म्हणाला. हाती चहाचा ट्रे होता. पहिला कप सागरला देऊन मला म्हणाला,

‘‘बसणार राणी सरकार की पाजू मी चहा?’’

मी बसण्याची धडपड करू लागले. ओढून आणलेलं चंद्रबळ! ते किती खोटं आहे हे पोटाने दाखवून दिलं. कळा सुरू झाल्या.

‘‘अंहं, अंहं! ‘चहा पाज’ असं तुम्ही सांगत नसलात तरी तुमचं शरीर सांगतंय राणी सरकार! चहा आम्ही पाजणार,’’ मला खालीच दडपून ठेवत अरविंद म्हणाला. बशीत चहा ओतू लागला. त्याच्या हातातला चमचा ओढून घेत सागर म्हणाला,

‘‘मी पाजतो.’’

‘‘का? ‘वनवासीं’च्या मुलांना औषधं नि ‘ट्रिपल पोलिओ’ पाजायची सवय आहे म्हणून का?’’ अरविंदने विचारलं.

‘‘मला चहा थंड चालतो म्हणून.’’ सागर उत्तरला.

‘‘चहा नसलेलाही तुला चालतो हेही मला माहीत आहे.’’ अरविंद म्हणाला.

‘‘तुला उकळता चहा लागतो ना. मी भाग्यवतीला पाजतो, तोपर्यंत तू चहा घे.’’

‘‘काही नकोय माझ्या बायकोला एवढं जपायला.’’

‘‘मी तर तुलाही जपतो आहे, अरविंद.’’ सागर म्हणाला.

‘‘तेही नको. अरे, आता केव्हातरी भाग्यवती गेली तर ‘शेवटचा चहा’ माझ्या हातचा होता हे समाधान मला तू मिळू देणार आहेस की नाही?’’ अरविंद म्हणाला. आणि माझ्याच काय, पण नित्यगंभीर स्वभावाच्या सागरच्या चेहऱ्यावरही हसू उमललं. पुरते कुरळे केस त्याचे. थकल्या चेहऱ्यावरचा गोडवा अजूनही कायम आहे. बिच्चारा! ‘वनवासीं’साठी कुठे कुठे आश्रम उभार, धरणं धर, मोर्चे काढ, अंगावर खटले घे, ते जिंकून दाखव, यांत हयात गेली बिचाऱ्याची. या नाजूक देहात, कविवृत्तीच्या मनात कुठून आली ही धमक नि लढाऊ वृत्ती? अशा विचारांत मी गुरफटून गेले तेव्हा तोंडात चहा पसरला. कधी आपलं तोंड उघडलं गेलं हे कळलंच नाही मला. पाहिलं तर सागरच चहा पाजत होता. चेहऱ्यावर प्रश्न उमटला असावा माझ्या, तो ओळखून सागर म्हणाला,


‘‘शेवटी ‘समझोता’ झाला आमच्यात, अर्धा अर्धा चहा पाजायचा. गरम चहा हवा म्हणून तो पिऊन झाल्यावर अरविंदच्या हाती जाईल हा चमचा.’’

‘‘तो कोणाच्या हाती जातो आहे याचं भान नाही तुला भाग्यवती. असं कसं चालेल? अरविंदची बायको आहेस ना? ढासळा-कोसळायला, स्वत:त हरवून जायला बंदी आहे तुला! ‘पार्शियल डिमेन्शिया’ला लाथ मारायची नि ‘खेकडे’ हाती आले तर त्यांच्या नांग्या मोडायची हिंमत हवी तुझ्यात! मर्दाची बायको आहेस तू! कुणाची?’’

‘‘मर्दाची बायको! म्हणजे ‘मर्दीण!’ नाही का?’’ सागर म्हणाला. आम्ही हसू लागलो. हसताना मला ठसका लागला. अरविंदने कप खाली ठेवला. स्वत:चा चहा अर्धवट सोडायला मी विरोध करीन हे ओळखून त्याने त्याचा कप उलटा करून दाखवला. चहा पिऊन झालाय हे दाखवलं. माझ्या पोटावरून, छातीवरून तो हात फिरवत राहिला. ठसका थांबल्यावर चहा पाजायचं काम सागरनंच पूर्ण केलं. मग पुन्हा ती ‘कळयात्रा’ सुरू झाली. मी सांगितलं नव्हतंच. पण अरविंदला माझ्या साऱ्या गरजा कळतात. कॉटची लिव्हर फिरवून त्याने डोक्याकडे उतार दिला. अभिषेकपात्राचा स्टॅण्ड डोक्यावर ओढला. मर्मबिंदूवर पाण्याची बारीक धार पडू लागली. कळा विझल्या नाहीत, तरी झोपेची जाणीव कळांवर हळूहळू फुंकर घालत राहिली. हळूहळू झोप येत गेली.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## इंडियाज रेल्वेमॅन

**राजेंद्र बी. आकलेकर**

अनुवाद

**अनुराधा राव**

पृष्ठे : २०८

किंमत : ३२०

*कोकण रेल्वे प्रकल्प आणि दिल्ली मेट्रो यांसारखी आव्हानं पेलणाऱ्या श्रीधरन यांचं प्रेरणादायक चरित्र*

**श्रीधरन - कोण बरं?**

**दिग्गजांच्या पाऊलखुणा**

रेल्वे आणि रेल्वेची सुरुवात असं म्हटलं, की प्रथम डोळ्यांपुढे येतात ते म्हणजे इसामबार्ड किंग्डम ब्रुनेल (१८०६-१८५९) आणि स्टीफन्सन पिता-पुत्र हे ब्रिटिश

अभियंते! जॉर्ज स्टीफन्सन (१७८१-१८४८) आणि त्यांचा मुलगा रॉबर्ट (१८०३-१९५९) यांना स्वयंचलित आगगाड्या, लोहमार्ग तयार करणे आणि त्या मार्गावरून सर्वप्रथम यशस्वीरीत्या गाड्या चालवण्याचे (भारतातदेखील) श्रेय जाते; तसेच ब्रुनेल यांना सर्वोत्तम रेल्वेप्रणाली (ग्रेट वेस्टर्न), पाण्याखालील पहिला बोगदा (थेम्स नदी), क्लिफ्टन झुलता पूल (ब्रिस्टॉल), जास्त वेगाने धावणाऱ्या आगगाड्या, विविध प्रकारची वाफेवर चालणारी जहाजे, ट्रान्स-अटलांटिक वाफेचे जहाज आणि इतरही अनेक गोष्टींचे श्रेय द्यायला हवे.

सार्वजनिक वाहतूक-व्यवस्था आणि आधुनिक अभियांत्रिकीच्या क्षेत्रात या कल्पक रचनांनी कायमस्वरूपी, आमूलाग्र क्रांती घडवली. औद्योगिक क्रांती, रेल्वेचा प्रारंभ आणि १७ ते १९व्या शतकातील वाफेवर चालणारी इंजिने, आगगाड्या, यांच्या रोमांचकारी युगाचा अभ्यास करताना, अभियांत्रिकी क्षेत्रातल्या या रथी-महारथींनी घालून दिलेल्या वस्तुपाठाचा आजही उपयोग होताना दिसतो.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातही एका महान अभियंत्याचा– सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा– जन्म १८६१मध्ये झाला. त्यांना १०१ वर्षांचं दीर्घायुष्य लाभलं. ते १९६२मध्ये निवर्तले. सर एम. व्ही. हे केवळ अभियंताच नव्हते, तर प्रशासक आणि मुत्सद्दी सल्लागारही होते. अनेक धरणे, लोहमार्ग, सार्वजनिक बांधकामे, कारखाने, प्रयोगशाळा, पोलाद कारखाने, अभियांत्रिकी संस्था अशा भारतभर विखुरलेल्या अनेक उत्तमोत्तम प्रकल्पांत त्यांचं योगदान पाहायला मिळतं. त्यांच्या प्रमुख कामांपैकी एक आहे, म्हैसूरच्या कृष्णराज सागर धरणाची निर्मिती. तसेच हैदराबाद इथे पूरसंरक्षक यंत्रणा उभारणीचे श्रेयही या प्रमुख, कल्पक रचनाकाराचेच! १९११मध्ये 'कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ द इंडियन एम्पायर' (CIE) या पदावर एम. व्ही. यांची नेमणूक झाली. तसेच त्यांनी जनहितार्थ केलेल्या कामाबद्दल ब्रिटिश राजवटीकडून त्यांना 'नाइट कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द इंडियन एम्पायर' (KCIE) या पदवीने गौरविण्यात आलं आणि पुढे, स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने 'भारतरत्न' देऊन त्यांचा सन्मान केला. दि. १५ सप्टेंबर म्हणजेच एम. व्ही. यांचा वाढदिवस 'अभियंता दिवस' म्हणून भारतात साजरा केला जातो.

### भारताचे आधुनिक ब्रुनेल किंवा सर एम. व्ही.

तत्कालीन मद्रास प्रांतामधील मलबार जिल्ह्यात, म्हणजे सध्याच्या केरळ राज्यातील पलक्कड जिल्ह्यात श्रीधरन यांचा जन्म झाला. तसेच १९व्या

शतकातील ब्रुनेल यांच्याप्रमाणेच लोहमार्ग, भारताच्या मोठ्या पहिल्या जहाजाची निर्मिती, मेट्रो प्रकल्प व पूल उभारण्याच्या कामात श्रीधरन यांचा सहभाग होता आणि सर 'एम. व्हीं.'प्रमाणेच खंडप्राय देशात सर्वदूर त्यांनी काम केले.

एलाट्टूवलापिल श्रीधरन यांचा जन्मदिवस आहे १२ जून, १९३२! आधुनिक भारताच्या इतिहासातील काही अत्यंत महत्त्वाच्या घटना त्यांनी पाहिल्या (तेव्हा श्रीधरन दहावीत शिकत होते.) भारताला मिळालेलं स्वातंत्र्य, त्यानंतर समाजात झालेला बदल, चीन व पाकिस्तानबरोबर झालेली युद्धं, भारतीय रेल्वेचा देशव्यापी संप तसेच आणीबाणी अशा कितीतरी घटनांचे ते साक्षीदार आहेत. तथापि, त्यांच्या कारकिर्दीचा आलेख पाहता असं लक्षात येतं, की सार्वजनिक घटनांपासून ते दूर राहिले. त्यांनी आपल्या कामावरील एकाग्रता कधी ढळू दिली नाही– मग त्यांच्या आसपास घडणारी घटना किती का मोठी असेना!

ब्रुनेल आणि सर एम. व्ही. यांच्याशी विलक्षण साम्य असलेले, २१व्या शतकातील आदर्श व्यक्तिमत्त्व डॉ. ई. श्रीधरन यांची ही जीवनकहाणी आहे. श्रीधरन यांनी सार्वजनिक वाहतूकव्यवस्थेचा आणि रेल्वेचा संपूर्ण चेहरामोहराच बदलला. त्यांच्या आधिपत्याखालील दोन महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांमुळे प्रवासाला नव्या दिशा लाभल्या आहेत. भारतवासीयांचा प्रवास सुकर झाला! यातील पहिला म्हणजे, भारताच्या पश्चिम घाटातील अतिशय दुस्तर भूभागातून मार्ग काढत बांधलेला ७६० किलोमीटर लांबीचा कोकण रेल्वे प्रकल्प. ब्रिटिश काळात या मार्गाचा विचार झाला; पण नंतर 'दुस्तर मार्गामुळे अशक्य' असा शेरा मिळाल्यामुळे हा प्रकल्प अर्ध्यावरच सोडावा लागला. श्रीधरन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सात वर्षांत हा प्रकल्प पूर्ण केला. या लोहमार्गामुळे अहमदाबाद ते मंगळूर या प्रवासातील अंतर १२१८ किलोमीटरने कमी झालं!

रोजच्या जीवनाला बाधा न आणता, गजबजलेल्या शहरात कमीतकमी उलथापालथ करून, अतिशय गर्दीच्या मार्गात साकारलेला दिल्लीतील 'मेट्रो रेल्वे' हा दुसरा महत्त्वाचा प्रकल्प! हा प्रकल्प पूर्ण होण्यासही सात वर्षं लागली; पण शहरातील प्रवासाच्या गडबड-गोंधळाला व्यवहार्य पर्याय देणारा तो यशस्वी नमुना मानला जात आहे. भारतातल्या अनेक महत्त्वाच्या शहरांत याच पद्धतीने मेट्रो प्रकल्प उभारण्यात येत आहेत; कारण शहरी वाहतूकसमस्येवर हाच तोडगा असल्याचं लक्षात आलं आहे.

श्रीधरन यांच्या या व अशा अनेक यशोगाथा सर्वांना माहितीच आहेत; परंतु

आपली तत्त्वनिष्ठा जपण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे दिलेल्या लढ्यांबद्दल, तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेल्या या महान प्रकल्पांचं काम होताना घडलेल्या अनेक रंजक गोष्टी मात्र फारच थोड्या लोकांना माहीत आहेत.

उदाहरणार्थ – तुम्हाला हे माहीत आहे का, की 'कोकण रेल्वे निगम मर्यादित'चे अध्यक्ष व कार्यकारी संचालक या पदाची जबाबदारी घेऊन कामाला सुरुवात केल्यानंतर तब्बल दोन वर्षांनी त्यांना 'नेमणूक पत्र' दिलं गेलं आणि त्यांचा पगार होता फक्त रु. १,०८०. त्यामागचं तथाकथित कारण असं होतं, की श्रीधरन हे भारतीय रेल्वे मंत्रालयातून निवृत्त झाले होते आणि तिथून त्यांना निवृत्तिवेतन मिळतच होतं!

हे अन्यायकारक असल्याने श्रीधरन यांनी निषेध नोंदवला; पण पैशांसाठी नाही, तर तत्त्वासाठी! श्रीधरन यांच्या मते 'कोकण रेल्वे निगम मर्यादित' या ४०० कोटींची वार्षिक उलाढाल असलेल्या प्रकल्पाच्या अध्यक्ष व कार्यकारी संचालक या पदावर नेमणूक केल्यावर इतकं कमी वेतन देणं योग्य नव्हतं, गैरच होतं. त्यांच्या अनेक सहायकांना मिळणाऱ्या वेतनापेक्षाही ते कमी होतं. कोकण रेल्वे प्रकल्पाचं काम अविरतपणे चालू राहिलं; पण श्रीधरन यांनीही अधिकृत पत्रव्यवहार करत, या विषयाचा पाठपुरावाही अथकपणे चालू ठेवला. दोन्हीकडील पत्रांनी फाइलची जाडी मात्र वाढत राहिली. रेल्वेमंत्र्यांच्या कार्यालयात जाऊन, अनेक मान्यवर प्रत्यक्ष बोलू शकले असते; पण त्यांनी तसं केलं नाही. इतक्या प्रदीर्घ पत्रव्यवहारालाही हवा तसा प्रतिसाद मिळत नाही, हे लक्षात आल्यावर त्यांनी न्यायालयाचं दार ठोठावलं. रेल्वे मंत्रालयाकडे कोकण रेल्वेचं काम यशस्वीपणे सुपुर्द केल्याला त्या वेळी दहा वर्षं पूर्ण झाली होती. तेव्हा न्यायालयाने, 'भारतीय रेल्वे प्रशासनाने श्रीधरन यांची थकबाकी त्यांना व्याजासहित द्यावी' असा आदेश दिला.

१९७०मध्ये कोचीन गोदीचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक असतानाही त्यांना त्यांच्या तेव्हाच्या कार्यकालानुसार रेल्वे अभियंता श्रेणीप्रमाणेच वेतन दिलं गेलं होतं. ते भूषवीत असलेल्या मोठ्या पदाच्या आणि पेलत असलेल्या जबाबदाऱ्या याच्या मानाने ते वेतन फारच अल्प होतं.

दिल्ली मेट्रोचं काम चालू असताना त्यांनी आंतरराष्ट्रीय मान्यता असेलेले प्रमाणित गेजचे रूळ वापरावेत, अशी सूचना केली होती; ती पाळली गेली नाही. तसेच भारतीय रेल्वेने इथे प्रतिष्ठेचा प्रश्न करून तो कळीचा मुद्दा ठरवला आणि ब्रॉड गेज रुळांचा मार्गच स्वीकारण्याचा आग्रह धरला. त्यामुळे या कामाचा अवधीही वाढला आणि पैसे तर खूपच जास्त खर्च झाले - या सर्व

हकिकती श्रीधरन यांनी सांगितल्या. महाराष्ट्रातील राजकीय नेते श्री. शरद पवार यांच्याबद्दल श्रीधरन यांनी गौरवोद्गार काढले. पवारसाहेबांनीच राज्य सरकारांना पटवून दिलं, की यापुढे सर्व राज्यांतील मेट्रो प्रकल्पांसाठी स्टॅन्डर्ड गेज रुळांचाच वापर व्हावा. आजतागायत या निर्णयाचं पालन होत आहे.

२०१५मध्ये काश्मीरमधल्या एका विवादास्पद रूळजोडणीबाबत, श्रीधरन यांच्या नेतृत्वाखालील भारतीय रेल्वे समितीने काही शिफारशी केल्या, तेव्हा रेल्वे बोर्डाने न्यायालयात 'कोकण रेल्वेचं सुरक्षा रेकॉर्ड डागाळलेलं आहे,' असं विधान करून, रेल्वे अभियंता म्हणून त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल जाहीरपणे प्रश्न उपस्थित केले.  असं असूनही याच रेल्वे बोर्डाने श्रीधरन यांची समितीप्रमुख म्हणून नियुक्ती केली होती आणि या समितीचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी एकसदस्यीय समितीवरही त्यांनाच नेमलं होतं.

त्यांच्या कार्यकालावर नजर टाकल्यास अनेक यशस्वी कहाण्या दिसतात. भारताच्या पहिल्या मोठ्या जहाजाची बांधणी, वादळामुळे पडझड झालेल्या पुलाची कमीतकमी वेळात केलेली पुनर्बांधणी इत्यादी. विद्यार्थी, अभियंते आणि लाखो भारतीयांच्या मनात परम आदरणीय असलेले श्रीधरन आता वयाच्या ८४व्या वर्षीही विविध मेट्रो, तसेच रेल्वे प्रकल्पांचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. यू.एन.चे कार्यवाह बान की मून यांच्या आमंत्रणावरून युनायटेड नेशन्सच्या 'हाय लेव्हल ॲडव्हायजरी ग्रूप ऑन सस्टेनेबल ट्रान्सपोर्ट' (HLAG-ST) या समितीचे सदस्य म्हणून त्यांनी २०१५मध्ये काम पाहिलं. त्यांना भारतातील अनेक विद्यापीठे व संस्थांकडून सन्माननीय डॉक्टरेट, पारितोषिके तसेच जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाले आहेत. भारत सरकारनेही त्यांना पद्मश्री व पद्मविभूषण या पुरस्कारांनी सन्मानित केलं आहे. फ्रेंच व जपान सरकारतर्फेही त्यांचा गौरव करण्यात आला. हारतुरे व टीकाटिप्पणी एका बाजूला, हे खरंय; पण त्यांचं कितीही कौतुक झालं किंवा त्यांच्यावर कितीही टीका झाली, तरी श्रीधरन साधेसुधे, विनम्र, तत्त्वनिष्ठ, प्रामाणिक आणि आपल्या पारंपरिक निष्ठांवर ठाम असणारे, सरकारी नोकरी करणारे रेल्वे अभियंता आहेत. त्यामुळेच त्यांना असाधारण यशप्राप्ती झाली!

◆

**नवी संहिता... नवा आशय...**

मराठ्यांचा इतिहास
खंड १
**।। शिवशाही ।।**

**डॉ. जयसिंगराव पवार**





शिवशाही काळापासून ते राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतरच्या
कालखंडावर प्रकाश टाकणारा खंड

**किंमत : ७५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

ज्ञानयोगी एकनाथ


**मंजुश्री गोखले**




ज्ञान, भक्ती आणि लोककल्याण ही त्रिसूत्री...
सर्वसामान्यांसाठी ठरेल कल्याणकारी

**किंमत : ५२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पुस्तकाच्या पानांतून




## डेंजरस माइंड्स

**एस. हुसैन झैदी**
**ब्रिजेश सिंग**

अनुवाद
**अमृता दुर्वे**

पृष्ठे : २१६
किंमत : ३२०

*सज्जन भासणाऱ्यांमध्येच रुजलेली असतात दहशतवादाची बीजं... मग घडतात बॉम्बस्फोटासारखी घटितं*

### द डेव्हिल्स ॲडव्होकेट

**पिस्तूल आणि हिंमत**

मुंबईच्या नोंदणीच्या नंबरप्लेट असलेल्या सहा पोलीस जिप्सी गाड्या पडघ्याच्या वेशीजवळ हिरव्यागार रस्त्यावरून वेगाने धावत होत्या. असर-सूर्यास्तापूर्वीच्या प्रार्थनेची वेळ झाली होती. मुअज्जिनची बांग थोड्याच

वेळात ऐकू आली असती. पडघ्यातल्या बोरिवली गावाकडे हा फौजफाटा शांतपणे; पण वेगाने धावत असताना तीन गाड्यांतल्या पोलिसांनी आपापली कार्बाइन्स तपासून घेतली. मुंबईपासून ६५ किलोमीटरवरचं नाशिक हायवेवरचं हे गाव. येणारे-जाणारे चौकसपणे या गाड्यांकडे पाहत होते, कारण १० हजारांची वस्ती आणि ९७ टक्के मुस्लीम असणाऱ्या गावात मुंबई पोलिसांचं येणं ही काही नेहमी घडणारी गोष्ट नाही आणि स्वागतार्हही नाही.

२७ मार्च २००३ या दिवशी पोलिसांच्या टीमचं नेतृत्व करत होते मुंबई पोलिसांमधले दोन विख्यात एन्काउंटर स्पेशलिस्ट-पोलीस इन्स्पेक्टर प्रदीप शर्मा आणि पोलीस सबइन्स्पेक्टर दया नायक. पहिल्याकडे ९५ चकमकींचा अनुभव होता, तर दुसऱ्याने तब्बल ५० गँगस्टर्सचा खात्मा केला होता.

पडघा पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्टर नितीन पाटील यांच्याशी प्रदीप शर्मांचं बोलणं झालं होतं आणि त्यांना हवा असलेला इसम नेमका कुठे दडून बसलाय, याची माहिती त्यांना मिळालेली होती. किंबहुना पाटील नेहमीची भेट असल्याचं कारण देत दुपारी ३ वाजल्यापासून मुंबई पोलिसांना हव्या असलेल्या या माणसाच्या दिवाणखान्यात बसून होते. पाटील आणि त्यांच्या टीमची चहा-नाश्त्याने सरबराई केली जात होती.

टार्गेटच्या जुन्या घराबाहेर डांबरी रस्ता जिथे संपतो तिथे जिप्सीज थांबल्या. इथून पुढे चिंचोळ्या गल्लीतून २० मीटरवर या माणसाचं नव्याने बांधलेलं घर आहे. वाहने यापुढे जाऊ शकत नाहीत, म्हणून मग चालकांना गाड्या पटकन वळवून इंजीन सुरूच ठेवत, क्षणार्धात निघण्यासाठी सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

एका गाडीच्या पुढच्या सीटवरून उतरून शर्मा पुढे चालू लागले. ही गल्ली इतकी चिंचोळी आहे की, दोन माणसांना बाजूबाजूला चालणंही शक्य नाही. काही क्षणांतच मुंबई पोलिसांच्या टीमने त्या घरात शिरत कुटुंबीयांना चकित केलं. ज्या माणसाला अटक करण्यासाठी शर्मांना पाठवण्यात आलं होतं, त्याला आपल्यासोबत येण्यास त्यांनी सांगितलं; पण इतक्या सहजासहजी हार मानण्याची त्याची तयारी नाही.

बाकीच्या अधिकाऱ्यांसाठी एवढा इशारा पुरेसा आहे. दया नायक त्या माणसाला फरपटत बाहेर न्यायला लागतात. तो प्रतिकार करतो; पण तो चणीने लहान आणि दुर्बल. दोन धट्ट्याकट्ट्या अधिकाऱ्यांचा एकट्याने प्रतिकार करण्याची शक्ती त्याच्यात नाही. पण खर्ची पडणारी ही मिनिटं मोक्याची आहेत-एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा आणि दया नायक नेतृत्व करत असलेली मुंबई पोलिसांची टीम साकिब नाचणला मारायला आल्याची बातमी

बाहेर झपाट्याने पसरतेय.

मुलुंड स्टेशनजवळ उभ्या असलेल्या लोकल ट्रेनमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात सहभागी असण्याचा आरोप नाचणवर आहे. नाचणने शर्मांकडे अरेस्ट वॉरंट मागितलं. हा चुकीचा प्रश्न होता. एक क्षणही न दवडता शर्मांनी पोलिसांची ३८ रगर्स पिस्तूल काढत नाचणच्या कानशिलावर रोखली आणि निर्णायक सुरात जाहीर केलं, ''चल, नहीं तो गोली मार दूंगा.''

दहशत थरथरली - १३ मार्च २००३ रोजी मुंबईतल्या मुलुंड रेल्वेस्टेशनजवळ उपनगरीय लोकलच्या डब्यात बॉम्बस्फोट झाला आणि सहा दिवसांनंतरच पोलिसांनी साकिब नाचणला 'वाँटेड' जाहीर केलं. नाचण बोरिवली - पडघ्यातल्या त्याच्या घरात दडून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर मुंबईचे जॉइंट कमिशनर सत्यपाल सिंह आणि उपायुक्त राकेश मारिया यांना नाचणला त्याच्या बिळातून बाहेर काढायचं होतं.

मुलुंड स्टेशनमध्ये लोकल शिरल्याबरोबर महिलांसाठीच्या फर्स्ट क्लासच्या डब्यात शक्तिशाली स्फोट झाला. यात दोन महिला कॉन्स्टेबलसह चार महिला आणि सहा पुरुष मारले गेले. तपासाच्या काही कालावधीनंतर मुलुंड रेल्वे स्फोटाचा तपास आधीच्या डिसेंबर २००२ आणि जानेवारी २००३च्या स्फोटांसोबत जोडला गेला आणि याला नाव देण्यात आलं, 'ट्रिपल ब्लास्ट केस.'

हे बॉम्बस्फोट म्हणजे मुंबईकरांच्या मनावर कायमचा ओरखडा ओढणाऱ्या तीन तारखांच्या स्मरणार्थ घडवण्यात आलेले दहशतवादी हल्ले होते. १९९२ मध्ये बाबरी मशीद पाडण्यात आल्यानंतर बरोबर दहा वर्षांनंतर ६ डिसेंबर २००२ रोजी मुंबई सेंट्रल रेल्वेस्टेशनच्या मॅक्डॉनल्ड्समध्ये ठेवण्यात आलेल्या बॉम्बचा स्फोट झाला. यात कोणी मारलं गेलं नसलं, तरी २५ जण जखमी झाले. एअर कंडिशनरच्या जागेत ठेवण्यात आलेला हा बॉम्ब तसा ढोबळपणे बनवण्यात आलेला होता. या प्रकरणी काही महत्त्वाचे धागेदोरे शोधण्याचा प्रयत्न मुंबई पोलीस करत असतानाच महिनाभरातच दुसरा स्फोट झाला, या वेळी विलेपार्ले स्टेशनच्या बाहेर. स्टेशनबाहेरच्या सायकलवर ठेवण्यात आलेल्या टायमर डिव्हाइसचा संध्याकाळच्या ऐन गर्दीच्या वेळी स्फोट झाला. यात एका गरीब भाजीवाल्याचा बळी गेला, तर ३० जण जखमी झाले. २७ जानेवारी २००३ला झालेला हा स्फोट या परिसरातील श्रीमंत गुजरात्यांना डोळ्यांसमोर ठेवून घडवण्यात आल्याचं भासत होतं; पण अपेक्षित दिवसाच्या एक दिवस नंतर या बॉम्बचा स्फोट झाला आणि हातावर पोट असणाऱ्या भाजीवाल्यांना याचा त्रास झाला. या बॉम्बमध्ये असणारे तीक्ष्ण खिळे स्फोटानंतर चहूबाजूला

उडाले आणि लोकांना गंभीर जखमा झाल्या. १३ मार्च २००३चा मुलुंडचा स्फोट हा १९९३च्या मुंबई साखळी स्फोटांच्या स्मरणार्थ घडवण्यात आल्याचा अंदाज होता; पण पुन्हा एकदा इथे बॉम्बचा स्फोट अपेक्षेपेक्षा एक दिवस उशिरा झाला.

नाचणचं साम्राज्य अशी बोरिवलीची ओळख होती. इथून नाचणला अटक करणं म्हणजे सिंहाच्या तोंडातून घास काढून घेण्यासारखं होतं. त्यातूनही नाचणला जिवंत अटक करण्याची गरज असल्याने परिस्थिती आणखीन कठीण झाली होती. मुलुंडमध्ये झालेल्या स्फोटांचा तो मास्टरमाइंड असल्याचा आरोप होता आणि त्याच्या चौकशीतून मिळणाऱ्या माहितीमुळे तीन स्फोटांच्या तपासाचं कोडं सोडवायला पोलिसांना मदत होणार होती.

उच्चपदस्थांच्या अनेक बैठकांनंतर जिगरबाज अधिकाऱ्यांनी धाडसी छापा टाकणं गरजेचं असल्याचं ठरवण्यात आलं. गावात शिरून नाचणला बाहेर काढण्याची मोहीम नक्की करण्यात आली. पण प्रश्न होता, मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण? या मोहिमेचा सेनापती म्हणून प्रदीप शर्मांची निवड करण्यात आली.

उंच, दणकट शरीरयष्टी आणि पिळदार बाहूंच्या शर्मांची सगळ्यात खतरनाक गँगस्टर्सनाही भीती वाटे. ४२ वर्षांचे जवळपास १०० किलो वजनाचे शर्मा एकदम रुबाबात वावरत.

क्राइम ब्रँचमधल्या सगळ्यात यशस्वी अधिकाऱ्यांपैकी एक असणाऱ्या शर्मांची कामगिरी जितकी मोठी होती तितकंच त्यांच्याभोवतीच्या वादांचं वलयही. आणि दया नायकसारख्या एका सामान्य वेटरमधून त्यांनी घडवलेला, गुन्हेगारांचा खात्मा करणारा ऑफिसर हा त्यांच्या अनेक योगदानांपैकी एक होता. या दोघांचं वर्णन बॉलिवूडच्या अनेक सिनेमांमध्ये आहे. पिळदार शरीरयष्टी तयार करण्यासाठी नायक यांनी व्यायामशाळेत अनेक तास घालवले होते. मीडियामधून शर्मांच्या या चेल्याच्या शरीर साधनेचे आणि त्यांच्या कामाचे अनेक गोडवे छापण्यात आले होते.

सत्यपाल सिंह आणि प्रदीप शर्मांनी यापूर्वीही एकत्र काम केलेलं होतं. मुंबईच्या पश्चिम उपनगरांचा कार्यभार सांभाळत असताना सिंह यांनी शर्मांच्या नेतृत्वाखाली एका विशेष पथकाची स्थापना केली होती. मुंबईच्या माफियाला निपटून काढण्यासाठी या पथकाला संपूर्ण स्वायत्तता देण्यात आली आणि या अमर्याद सामर्थ्याचा पुरेपूर वापर करत शर्मांनी मुंबईतल्या गुन्हेगारी विश्वाला खिंडार पाडलं.

आता मुंबईच्या क्राइम ब्रँचचे मुख्य असणाऱ्या सिंह यांनी या वेळी मात्र

शर्मांना यापेक्षा मोठ्या कामगिरीसाठी निवडलं होतं. शर्मांच्या आयुष्यातलं हे सर्वांत मोठं आव्हान असणार होतं. अट एकच होती, शर्मांना नाचणला 'जिवंत आणि इजा न करता' पकडायचं होतं.

शर्मांनी नंतर त्यांची त्या वेळची अडचण थोडक्यात सांगितली. 'दोन दशकं पोलीस म्हणून काम करत असताना मला गुन्हेगारांसोबत संवाद साधण्याची पाळी कधी आलीच नव्हती. मी त्यांना सरळ साध्या भाषेत ताकीद द्यायचो, त्यांनी जास्त हुशारी केली, तर त्यांना त्यांच्या कर्त्यांकडे पाठवायचो. पण नाचणला इजा न करण्याबाबत मला स्पष्टपणे/मुद्दामच सांगण्यात आलं होतं.'

या मोहिमेसाठीच्या टीमची जुळवाजुळव करण्यात आली आणि एक तपशीलवार योजना बनवण्यात आली. शर्मांच्या सोबत त्यांच्या विश्वासू सहकाऱ्यांसोबतच क्राइम ब्रँचचा स्पेशल ऑपरेशन स्क्वॉड (SOS) देण्यात आला. पडघ्याचे सीनिअर पोलीस इन्स्पेक्टर नितीन पाटील यांच्याशी शर्मांनी चर्चा केली. बोरिवलीला जाऊन शर्मांची टीम येईपर्यंत नाचणला गुंतवून ठेवण्याची विनंती त्यांना करण्यात आली. पोलिसांच्या या छाप्याविषयी कोणत्याही प्रकारे कुणकुण लागणार नाही, याची काळजी घेण्यात आली. एखाद्या हॉलिवूडपटातला वाटावा असा हा छापा होता. प्रत्येक मिनिटाची आखणी काळजीपूर्वक करण्यात आली होती आणि सगळ्या शक्यतांचा विचार करण्यात आला होता. आणि ही संपूर्ण कारवाई अगदी मोजक्या मिनिटांत संपणार होती.

व्यवहारचातुर्य आणि गौरव - बॉलिवूडच्या सिनेमात दाखवल्याप्रमाणे पडघ्यातल्या घरांवर हिरवे झेंडे फडकत नाहीत. इथे जवळपास ९७ टक्के मुसलमान कुटुंबे आहेत. त्यात काही दलितही आहेत; पण एकाही घरावर चंद्रकोर आणि ताऱ्याचा हिरवा झेंडा फडकत नाही. कट्टर दहशतवादी मुसलमान वस्ती म्हणून शिक्का मारण्यात आलेल्या जागेचं हे विरोधी वास्तव आहे.

२०१६ मध्ये व्हॉट्सॲपवर एक संदेश निष्काळजीपणे पसरवण्यात आला. यात प्रेषित मुहम्मद आणि त्यांची पत्नी आयेशा यांविषयी बदनामी करणारा मजकूर होता. याच्या विरोधात हे संपूर्ण गाव रस्त्यावर आंदोलन करत उतरलं. हायवे अडवण्यात आला आणि जवळच्या टोलनाक्याची नासधूस करण्यात आली. १५ किलोमीटरवरच्या भिवंडीपर्यंत हे आंदोलन पसरलं. पोलिसांनी या परिसरातल्या ५० तरुणांना अटक केली. या गावातल्या एका इंजिनिअर तरुणाने सांगितलं, 'महामार्गावरील आंदोलन आणि वाहतूक अडवल्याने आमच्याकडे साऱ्या देशाच्या नजरा वळल्या. आमचं गाव इस्लामचा आदर करतं आणि आमच्या इस्लामचा वा आमच्या लोकांचा उपमर्द आम्ही सहन करणार नाही.'

पडघ्याचं असं पुरोगामी इस्लामकडे झुकणं ही खरंतर गेल्या काही वर्षांत घडलेली बाब आहे. इथली मुस्लीमवस्ती ही ४०० वर्षांपेक्षाही जास्त जुनी आहे, तर काही मशिदी या अडीचशे वर्षं जुन्या आहेत. पडघ्यातली हिंदूवस्ती आणि मुसलमान बोरिवली गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर असलेल्या कबरस्तानातल्या थडग्यांवर ४०० वर्षांपूर्वी दफन करण्यात आल्याच्या नोंदी आहेत. या भागाला अजूनही एक पुरातनकालीन सौंदर्याची झाक आहे. त्या काळात वापरली जाणारी ग्रीक स्थापत्यशैली अजूनही अधूनमधून इथे डोकावते. या भागातल्या सर्वांत देखण्या एका घरामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये काँग्रेस पक्षाची गुप्त बैठक झाली होती.


या गावातले रहिवासी मुख्यत: तीन कुटुंबांतले आहेत. मुल्ला, खोत आणि नाचण. याशिवाय कोकणी मुस्लीमही आहेत, जे मराठी बोलतात. या गावाला आपल्या संस्कृतीशी बांधून ठेवण्यासाठी त्यांनी आधुनिकीकरणाचा फारसा स्पर्श होऊ दिलेला नाही. दंगलींनंतर या गावात आश्रयाला आलेल्या अनेक मुस्लिमांनाही बोरिवली गावाच्या परिघात जागा न देता फक्त ‘नई बस्ती’मध्येच घरं बांधण्याची परवानगी देण्यात आली होती. आपसात कितीही मतभेद असले, तरी या गावाने परंपरेनुसार एकीने परिस्थितीशी सामना केलेला आहे. जमाव म्हणून असणारी एकी हे त्यांचं सर्वांत मोठं सामर्थ्य आहे आणि या परिसरातल्या कायदा-सुव्यवस्था यंत्रणांसाठीचं सगळ्यात मोठं आव्हान.

१३ वर्षांपूर्वीच्या त्या घटनेच्या आठवणी आजही लोक काढतात आणि प्रदीप शर्मांसारखे प्रसिद्ध एन्काउंटर स्पेशालिस्ट आणि त्यांचा वादग्रस्त चेला दया नायक यांना त्यांच्या पहिल्या पराभवाची चव या लहानशा गावाने कशी चाखायला लावली, याचे किस्से अभिमानाने सांगतात.

या कामगिरीसाठी प्रदीप शर्मा योग्य व्यक्ती नव्हते. ९५ लोकांना यमसदनी धाडल्याची त्यांची कीर्ती या गावात त्यांच्या आधीच पोचलेली होती. नाचणला त्या लहानशा बोळातून फरपटत आणतानाची २० मीटरची चाल कदाचित त्यांच्या आयुष्यातली सगळ्यात कठीण पायपीट होती. पण त्या बोळातून बाहेर पडल्यावर जे दृश्य त्यांच्यासमोर होतं ते धक्कादायक होतं. SOS पथक आणि पोलिसांच्या जीपला हजारो पुरुष आणि बुरखाधारी स्त्रियांनी घेराव घातला होता आणि ते रडतभेकत होते. पोलिसांच्या टीमला शिव्याशापांची लाखोली वाहिली जात होती. जणू सर्व जमाव दुखवट्यासाठी गोळा झाला होता. ‘साकिबभाई को छोड दो’, अशा घोषणा दिल्या जात होत्या.

◆

# अभिप्राय




## संघर्षाच्या वाटचालीची दर्दभरी कहाणी

एखाद्या विद्यार्थ्याच्या मनात ज्ञानार्जनाची उत्कट ओढ असेल आणि त्यासाठी पडेल ते कष्ट करण्याची मनापासून तयारी असेल, तर असा विद्यार्थी सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीवर जिद्दीनं, हिमतीनं आणि चिकाटीनं मात करतो, शारीरिक वा मानसिक त्रास, अपमान, उपेक्षा पिळवणूक, अन्याय आणि अपेक्षाभंग इत्यादी संकटांना समर्थपणे सामोरं जात एक दिवस मनातील जिद्द सिद्ध करून दाखवतो. उराशी बाळगलेलं सोनेरी स्वप्न साकार झाल्याशिवाय तो थांबतच नाही. त्याच्या संघर्षाची वाटचाल वाचताना वाचकही हेलावून जातो. त्याच्या

अमर्याद कर्तृत्वाला आणि झुंजारवृत्तीला मनोमन सलाम करतो. अशी कहाणी ज्या कादंबरीत वाचावयास मिळते, ती म्हणजे, ‘दाही दिशा.’ डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या रसरशीत लेखणीतून उतरलेली ही हृदयस्पर्शी कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहे.

कथा, कविता, कादंबरी, नाटक, समीक्षा, संपादन आणि अनुवाद अशा विविध क्षेत्रांत विपुल आणि वैविध्यपूर्ण कामगिरी बजावलेलं मराठी साहित्यविश्वातलं बहुचर्चित असं एक नाव म्हणजे, डॉ. रवींद्र ठाकूर. ‘महात्मा’ या कादंबरीमुळे ते एकदम प्रकाशझोतात आले. त्यांची ‘धर्मयुद्ध’ ही कादंबरीही विलक्षण लोकप्रिय ठरली. सतत वाचन, चिंतन आणि लेखन हा त्यांचा पिंड. प्रतिभासंपन्न आणि संवेदनशील लेखक ही त्यांची ओळख. वयाची सत्तरी ओलांडल्यानंतर ते अंतर्मुख झाले आणि आयुष्याच्या पहिल्या व दुसऱ्या अंकाचं चिंतनशील वृत्तीनं कलात्मक चित्रण करण्याचा निर्णय घेतला. यातूनच साकार झालेली सर्वांगसुंदर कलाकृती म्हणजे, ‘दाही दिशा.’ आत्मकथनात्मक कादंबरीच्या दालनात मोलाची भर टाकणारी आणि वाचकांना खिळवून ठेवणारी कादंबरी लिहून डॉ. ठाकूर यांनी पुन्हा एकदा वाचक-समीक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

‘अरविंद पवार’ ही या कादंबरीतली मध्यवर्ती व्यक्तिरेखा असून तिच्याभोवतीच कादंबरीतलं संपूर्ण कथानक फिरत राहतं. अरविंद हा या कादंबरीचा नायक आहे. वडील प्राथमिक शिक्षक. सुमारे पन्नास वर्षांपूर्वीचा काळ. तुटपुंज्या पगारावर संसाराचा गाडा हाकण्यात दमछाक व्हायची.

‘खानदेश’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जळगाव जिल्ह्यातील दातर्ती हे मूळ गाव. सतत बदल्यांचा ससेमिरा. मुलांच्या शिक्षणाची आबाळ होऊ नये म्हणून वडिलांची धडपड. अरविंद आपल्या वडिलांना ‘भाऊ’ म्हणतो. एक हळवा कर्तव्यदक्ष, स्वाभिमानी, कुटुंबवत्सल, प्रामाणिक आणि कष्टाळू शिक्षक म्हणून त्यांनी लौकिक प्राप्त केल्याचं कादंबरी वाचताना सतत जाणवतं. बदलीच्या नोकरीचे सर्व दुष्परिणाम भोगताना त्यांनी कधीच संयम ढळू दिला नाही आणि तत्त्वांशी तडजोड केली नाही, अशी त्यांची व्यक्तिरेखा लेखकाने उभी केल्याचं विविध घटना-प्रसंगांतून लक्षात येतं.

जळगावसारख्या मोठ्या शहरात शिक्षण घेणं आर्थिकदृष्ट्या अशक्य असल्याचं वास्तव लक्षात घेऊन अरविंदला भाऊ शिक्षणासाठी कोळगावला घेऊन जातात. तिथे अल्पखर्चात हॉस्टेलची सोय होते, तळेगावला शेजारी असलेले भाऊंचे जुने मित्र माधवकाका यांचाही आधार लाभतो. इथून कादंबरीची

सुरुवात होते. तर, शिक्षण संपून लातूरला प्राध्यापक म्हणून हजर होण्यासाठी सावरगावहून अरविंद निघतो, इथेच कादंबरी संपते. अरविंदच्या व्यक्तिमत्त्वाचे एकेक पदर उलगडत जातात. त्याचा खडतर प्रवास वाचकांच्या मनाला भिडत राहतो. वडील मुख्याध्यापक असताना शाळेच्या कपाटातल्या पुस्तकांकडे तो आकर्षित होतो. शाळेच्या कपाटात 'चांदोबा' मासिकाचे अनेक अंक, हितोपदेश, पंचतंत्र असा खजिना अरविंदला सापडतो. तो झपाटल्याप्रमाणे वाचू लागतो. एक प्रकारचं वाचनाचं वेड त्याला लागतं. वाचन, चिंतन, अभ्यास आणि कष्ट ही त्याची चतुःसूत्री बनते. ज्ञानप्राप्तीची धडपड सुरू होते. गरिबीचे चटके बसू लागतात; पण अरविंद हार मानत नाही. किराणा दुकानात पुड्या बांधण्यापासून वेळप्रसंगी बांधकामावर मजुरी करून, घरोघरी पेपर टाकून, शिक्षकांच्या घरी पाणी भरून, हॉटेलमध्ये मजुरी करून आणि दारूसाठी लागणाऱ्या काळ्या गुळाची विक्री करून सतत पायपीट केल्यामुळे होणारा त्रास सहन करून तो पोटाची खळगी भरण्यासाठी प्रयत्नशील राहतो. शिक्षकांचे बरे-वाईट अनुभव त्याच्या वाट्याला येतात. चांगले शिक्षक जसे भेटतात, तसेच कामचुकार आणि सतत खलनायकी वृत्तीने वागणारे मिरकुटेसारखे शिक्षकही भेटतात. पण अरविंद आपली ज्ञानार्जनाची भूक भागवण्यासाठी सर्व संकटांना, समस्यांना तोंड देत राहतो. विनायक, चिंध्या, अशोक, सुदाम, निशिकांत अशा मित्रांच्या सहवासात तो दिवस ढकलत राहतो. त्यांचेही बरे-वाईट अनुभव स्वीकारत राहतो. शिक्षणव्यवस्थेतील सर्व दोष त्याच्या मार्गात अडसर बनून राहतात. अडथळे, अडचणी, संकटं यांना सामोरे जाताना तो शेवटपर्यंत खचून जात नाही. आत्मविश्वास गमावत नाही. याचं कारण म्हणजे प्राध्यापकच होणार ही याची महत्त्वाकांक्षा. 'कधीकधी वाटायचं- काय वाट्टेल ते होऊ दे, कितीही कष्ट उपसावे लागले तरी लागू दे. होईन तर प्राध्यापकच होईन... मास्तरकी किंवा कारकुनकी करण्यासाठी हा अरविंद जन्माला आलेला नाही.' (पृ. २२१) याच सूत्रावर अरविंदच्या व्यक्तिरेखेची उभारणी झाल्याचं आणि त्याचं स्वप्न साकार झाल्याचं कादंबरी वाचून संपवताना स्पष्ट होतं.

ही कादंबरी वाचताना उद्धव शेळके यांची 'धग' आणि आनंद यादव यांची 'झोंबी' कादंबरी सतत नजरेसमोर येणं स्वाभाविकच म्हणता येईल. पृ. १८६वर 'धग'चा उल्लेखही आढळतो आणि अरविंदची कथा 'धग'मधल्या नामापेक्षा वेगळी नसल्याचं कळून चुकतं. पृ. २८४वर कवी नारायण सुर्वे यांच्या 'माझे विद्यापीठ' वाचण्याचा संदर्भ येतो. 'दाही दिशांना पांगलेलं आपलं आत्मचरित्रच जणू त्या कवितांमध्ये शब्दरूप झालं आहे की काय, असं वाटत होतं.' या

वाक्यातून कादंबरीच्या एकूण आशयाचा आणि शीर्षकाचाही उलगडा होतो.

अहिराणी बोलीचा अधूनमधून होणारा सर्रास वापर, काही वेळा वापरली गेलेली हिंदी वाक्यं, इंग्रजी शब्दांचा क्वचितच केलेला उपयोग, प्रमाणभाषेत केलेलं तृतीयपुरुषी निवेदन, तळेगावचा परिसर, तमाशा, महापूर, औरंगाबादचा परिसर इत्यादी वर्णनांसाठी वातावरणनिर्मिती करण्याचं आणि भौगोलिक परिसराची ओळख पटवण्याचं लेखकाचं कौशल्य सतत जाणवत राहतं. अनेक वेळा शृंगाररसाचा आविष्कार घडविणारी वर्णनं येत राहतात. अरविंदच्या जीवनात कोमलच्या मैत्रीच्या धाग्याचा हळवा कोपरा स्पर्शून जातो. कथानकाच्या ओघात आशयाला अनुसरून येणारी शृंगारिक वर्णनं वाचताना बीभत्सरसाचा प्रत्यय येणार नाही, याची काळजी लेखकाने घेतल्याचं पुनःपुन्हा लक्षात येत राहतं. पासष्ट प्रकरणांमधून मांडलेली सुमारे तीनशे पानांची ही कादंबरी एकहाती वाचून संपवावी, अशीच आहे. याचं कारण अरविंदच्या दर्दभरी जीवनप्रवासाची, ध्येयवादी वृत्तीनं ज्ञानप्राप्तीसाठी त्यांनी केलेल्या अखंड धडपडीची लेखकानं ओघवत्या भाषेत आणि खुमासदार शैलीत केलेली मांडणी होय. 'अन्नासाठी दाही दिशा आम्हा फिरविसी जगदीशा' यात थोडासा बदल करून 'शिक्षणासाठी' हा शब्द योजला, की कादंबरीचं स्वरूप स्पष्ट होतं. नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना ध्येयप्राप्तीसाठी आदर्श वस्तुपाठ ठरणारी ही कादंबरी धगधगत्या वास्तवाचं 'यथार्थ' चित्रण करणारी असल्याने ती जशी वाचनीय, तशीच लोकप्रिय ठरण्यास प्रत्यवाय नाही.

लेखक डॉ. रवींद्र ठाकूर यांचा जीवनप्रवास ज्यांना माहीत आहे, अशा जवळच्या आणि जिव्हाळ्याच्या हितचिंतकांना व मित्रमंडळींना या कादंबरीचा नायक 'अरविंद पवार' की 'रवींद्र ठाकूर' असा प्रश्न पडतो. यातच या कादंबरीचं सारं यश सामावलेलं आहे, कादंबरीच्या शेवटी 'एक प्रवास संपला होता आणि दुसरा प्रवास सुरू झाला होता,' असं वाक्य वाचावयास मिळतं. पहिल्या प्रवासातले सर्व 'स्पीडब्रेकर्स' पार करून आता त्यांच्या जीवनप्रवासाची गाडी हमरस्त्यावरून भरधाव वेगाने दिमाखात धावत आहे. दाही दिशा पादाक्रांत करण्याचं पुरेपूर सामर्थ्य यांच्या अंगी भिनलेलं आहे, तरीही मागे वळून पाहताना, लेखकाने अंतर्मुख होऊन निर्माण केलेली ही साहित्यकृती म्हणजे, त्यांच्या सकस आणि दर्जेदार साहित्यनिर्मितीतली मोलाची भर होय.

**- प्राचार्य डॉ.जी.पी. माळी**

# ‘अमानुष : कळस क्रूरतेचा’




नोव्हेंबर २०२५ सुरू झाला आणि अचानक सुदानचा आक्रोश इन्स्टाग्रामच्या फीडवर दिसू लागला. स्क्रोल करताना सुदानमधील भीषण यादवी युद्धाची काही चित्रं दिसू लागली आणि मनात प्रश्नांचं काहूर माजलं. २०२५मध्ये वावरत असताना नरसंहारासारख्या घटनांना आळा का घालता येऊ नये? जगातल्या प्रत्येक देशातील माणूस आज प्रगतिपथावर मार्गस्थ असताना सत्तेच्या हव्यासापोटी निष्पाप आदिवासींना वेठीस धरून जिवंत जाळण्यासारख्या घटना का घडत आहेत? या भूतलावरचा प्रत्येक देश युद्ध करायला एवढा उत्तेजित का झाला आहे? माणसाला नक्की काय हवंय? कोणावर सत्ता गाजवायची आहे? आणि त्यातून शांती प्रस्थापित होईल? एकीकडे धर्म विचारून हत्या होत आहेत; तर दुसरीकडे एकाच धर्माचे असूनही जमात वेगळी म्हणून हत्या होत आहेत.

वर्तमानात सुरू असलेल्या सुदानमधील यादवी युद्धामध्ये उत्तर दार्फुर भागात मोठ्या प्रमाणात रक्तपात झाला आहे. नरसंहार, जिवंत जाळणं, जिवंत गाडणं आणि बेछूट गोळीबार याला तिथली अतिसामान्य जनता बळी पडत आहे. तिथल्या जमिनी रक्तानं लाल झाल्या आहेत. असंख्य लोक बेघर झाले आहेत; तर अनेकांना कायमचा जीव गमवावा लागला आहे. फक्त कोण्या एकाच्या कुठल्याशा हव्यासापोटी..! हे सगळं बघताना पुस्तकं नेहमीच काल्पनिक नसतात आणि अर्धं सत्य सांगणारीही नसतात, हेच जाणवतं.

आफ्रिका खंडातील सुदानमध्ये सध्या सुरू असलेल्या याच यादवी

हत्याकांडाबद्दल माहिती देणारं एक पुस्तक नुकतंच वाचनात आलं आणि हे सर्व फक्त २०२५मध्ये घडत नाहीये; तर अनेकानेक वर्षं हे भीषण युद्ध दार्फुर सहन करत आहे, हे समजतं. 'दार्'म्हणजे जमीन आणि 'फुर' म्हणजे वांशिक शेतकरी असलेले आदिवासी लोक, जिथे पिढ्या न् पिढ्या राहतात- तो भाग, म्हणजे 'दार्फुर.' याच दार्फुरमध्ये वसलेल्या पूर्वापार आदिवासी जमाती आणि दार्फुर पश्चिम भागात सुलतानांची असलेली छोटी-छोटी राज्यं ही तिथली तेव्हाची परिस्थिती. बहुतांश स्थानिक जमातींनी इस्लाम धर्माचा, तर दक्षिणेकडे ख्रिश्चन धर्माचा केलेला स्वीकार – अरब-स्थानिक मुस्लीम-ख्रिश्चन यांच्यातील वर्षानुवर्षांच्या सलोख्यात ब्रिटिशांनी जाताजाता पाडलेली फूट – त्यामुळे अरब व ख्रिश्चन यांच्यात पेटलेलं द्वंद्व आणि दक्षिणेकडील ख्रिश्चनांवर लावलेला 'शारियत' कायदा – त्यामुळे दार्फुरी जाती आणि अरब यांच्यातील व्यवहार थांबले.

सरकारच्या चिथावणीमुळे अरब पेटून उठले व रक्तपाताचं सत्र अहोरात्र सुरू झालं; परंतु अशातच, 'सुदान मुक्तिसेना' व 'न्याय व समता चळवळ' यांनी २००३मध्ये सरकारविरुद्ध उघडउघड युद्ध पुकारलं, तेव्हापासून सुदानी सैन्य, जंजाविद, सरकारधार्जिणे सशस्त्र गट यांनी दार्फुरच्या जनतेला चिरडून टाकण्याचा सपाटा लावला आणि यानंतर सुरू झाला- मृत्यू, बलात्कार, कत्तली, बॉम्बहल्ले व जीवाच्या आकांताने केलेला स्थलांतराचा भयावह प्रवास... जो आजतागायत सुरूच आहे..! नव्या यंत्र-तंत्र युगात जगताना आपल्या संरक्षित असण्याची किंमत आपल्याला अशा घटनांमधून कळून चुकते. डॉ. प्रा. उमेश कदम लिखित आणि मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित 'अमानुष' या पुस्तकाचं हेच कथानक आहे.

२००३पासून सतत सुरू असलेल्या चकमकींचे आणि जीव वाचवण्यासाठी जीवाच्या आकांताने पळ काढणाऱ्या या गरीब जनतेच्या वेदना या प्रांताबाहेरील लोकांपर्यंत पोहोचाव्या, यासाठी दिवस-रात्र स्वत:चा जीव धोक्यात घालून जावेद ऊर्फ सुलेमान म्हणजेच खऱ्या आयुष्यातील 'दाऊद हारी'काम करतात. त्यांनी लिहिलेल्या 'द ट्रान्सलेटर' या आत्मवृत्तपर पुस्तकातूनही काही विस्मयकारक घटनांचे तपशील लेखकाने या पुस्तकात मांडले आहेत. पुस्तक वाचून सुन्न होत असतानाच, दूर कुठेतरी ते सत्यात उतरलंय, ही जाणीव विद्ध करते. या हत्याकांडात जे मृत्युमुखी पडले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- विशाखा बेके**

◆

## १६ डिसेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते ३१ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ डिसेंबर - जॅन येगर यांचा जन्मदिन**

‘मैत्री अशी आणि तशी’, ‘वर्क लेस, डू मोअर’ या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५४५/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**१६ डिसेंबर - विजय दिवस**

‘परमवीर चक्र’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २४६/-**

---

**२० डिसेंबर - मॅथ्यू ग्लास यांचा जन्मदिन**

‘एन्ड गेम’, ‘अल्टिमेटम’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**मूळ किंमत १२९०/- । सवलत किंमत ७५३/-**

---

**२० डिसेंबर - प्रतिमा कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘रुजवाई’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**२१ डिसेंबर - यू. आर. अनंतमूर्ती यांचा जन्मदिन**

‘संस्कार’, ‘अवस्था’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२३ डिसेंबर - किसान दिवस**

‘आधुनिक द्राक्ष लागवड’, ‘विपुलाच सृष्टी’, ‘केल्याने होत आहे रे’, ‘सुंदर आपली फुलबाग’, ‘सुंदर आपली फळबाग’, ‘शेती करू फायद्याची’, ‘बोन्साय’, ‘घरातील बाग’, ‘छंद बागेचा’, ‘कॉर्पोरेटला रामराम शेतीला सलाम’, ‘मळ्याची माती’, ‘मातीचे मम अवघे जीवन’, ‘हल्या हल्या दुधू दे!’, ‘शेतकऱ्याचा असूड’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २८७५/- । सवलत किंमत २०१३/-**

---

**२४ डिसेंबर - मधुवंती सप्रे यांचा जन्मदिन**

‘ध्यासपर्व’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६२/-**

**२४ डिसेंबर - सुरेशचंद्र नाडकर्णी यांचा जन्मदिन**
‘ग़जल’, ‘नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी’, ‘पृथ्वीवर माणूस उपराच’, ‘अज्ञाताचे विज्ञान’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८३०/- । सवलत किंमत ५३१/-**

---

**२४ डिसेंबर - भारतीय ग्राहक दिन**
‘मेहता पब्लिशिंग हाऊस’च्या सर्व पुस्तकांवर (प्रत्येकी १) ४० टक्के सवलत. ही सवलत नेट २५००/- व अधिकच्या खरेदीवर लागू.
**(ही सवलत फक्त २४ डिसेंबर या एक दिवसासाठी आहे.)**

---

**२५ डिसेंबर - प्रज्ञा ओक यांचा जन्मदिन**
‘बुक मार्क’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२५ डिसेंबर - ख्रिसमस**
बालसाहित्याच्या २५००च्या खरेदीवर ४० टक्के सूट
**(ही सवलत फक्त २५ व २६ डिसेंबर या दोन दिवसांसाठी आहे.)**

---

**२८ डिसेंबर - बाबा आमटे यांचा जन्मदिन**
‘अमरगीत’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**२८ डिसेंबर - जॉन ग्रे यांचा जन्मदिन**
‘‘स’सुखाचा’, ‘तो आणि ती’, ‘तुला आठवताना’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११४५/- । सवलत किंमत ७७५/-**

---

**२८ डिसेंबर - डेव्हिड ॲलन यांचा जन्मदिन**
‘गेटिंग थिंग्ज डन’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

---

**२९ डिसेंबर - भावेश भाटिया यांचा जन्मदिन**
‘रुक जाना नही’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४५/-**

---

**३० डिसेंबर - जयसिंगराव पवार यांचा जन्मदिन**
‘आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध’, ‘छत्रपती संभाजी : एक चिकित्सा’,

‘मराठेशाहीचे अंतरंग’, ‘मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध’, ‘राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा’, ‘राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे’, ‘राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे’, ‘राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे’, ‘राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे’, ‘शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे’, ‘शिवछत्रपती एक मागोवा’, ‘राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास’, ‘समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती’, ‘क्रांतिसिह नाना पाटील’, ‘वेध अमुच्या इतिहासाचा’, ‘छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ’, ‘व्यक्तिवेध : शरद पवार ते गोविंद पानसरे’, ‘युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी’, ‘शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना’, ‘राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय’, ‘दादाजी कोंडदेव कोण होता?’, ‘मराठ्यांचा इतिहास खंड १’, ‘मराठ्यांचा इतिहास खंड २’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८७६०/- । सवलत किंमत ६३०७/-**

**३१ डिसेंबर - मेगन चान्स यांचा जन्मदिन**
‘द स्पिरिच्युअॅलिस्ट’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

**खालील संचांवर १ ते १५ जानेवारी २०२६ दरम्यान खास सवलत**

**१ जानेवारी - मायकेल गेट्स गिल यांचा जन्मदिन**
‘हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाइफ’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१९/-**

**१ जानेवारी - तान त्वान एंग यांचा जन्मदिन**
‘द गिफ्ट ऑफ रेन’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ७२०/- । सवलत किंमत ३७५/-**

**१ जानेवारी - पॉल कार्सन यांचा जन्मदिन**
‘बिट्रेयल’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**१ जानेवारी - अॅनी बरोज यांचा जन्मदिन**
‘गर्नसी वाचक मंडळ’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

**१ जानेवारी - नादिया मुराद यांचा जन्मदिन**

‘द लास्ट गर्ल’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४६०/- । सवलत किंमत ३२५/-**

**१ जानेवारी - सॅम ख्रिस्टर यांचा जन्मदिन**

‘द स्टोनहेंज लेगसी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-**

**२ जानेवारी - ए. जे. फिन यांचा जन्मदिन**

‘द वुमन इन द विंडो’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६३०/- । सवलत किंमत ४७२ /-**

**३ जानेवारी - ग्रेटा थुनबर्ग यांचा जन्मदिन**

‘ग्रेटाची गोष्ट’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**३ जानेवारी - जसवंत सिंग यांचा जन्मदिन**

‘ए कॉल टू ऑनर’, ‘जिना’ या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ४७९/-**

**३ जानेवारी - राजेंद्र खेर यांचा जन्मदिन**

‘बिंदू सरोवर’, ‘उदयन’, दिग्विजय’, ‘हॉलीवूडचे विनोदवीर’ या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ११९५/- । सवलत किंमत ८३२/-**

**३ जानेवारी - सावित्रीबाई फुले जयंती**

‘महात्मा (जोतिराव फुले)’, ‘मी मलाला’, ‘स्टोन्स इन्टू स्कूल’, ‘थ्री कप्स ऑफ टी’, ‘ज्ञानाई सावित्रीबाई फुले’ या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८९५/- । सवलत किंमत ११२४/-**

**४ जानेवारी - कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘मराठी भाषा उद्‌गम व विकास’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत १९९/-**

**७ जानेवारी - शोभा डे यांचा जन्मदिन**

‘सिलेक्टिव्ह मेमरी’, ‘स्पीड पोस्ट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८२०/- । सवलत किंमत ५५०/-**

**८ जानेवारी - स्टीफन हॉकिंग यांचा जन्मदिन**

'जॉर्ज ॲन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स', 'जॉर्ज ॲन्ड द ब्ल्यू मून', 'जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाइम', 'जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६७०/- । सवलत किंमत १८७०/-**

---

**८ जानेवारी - मार्क व्हिक्टर हॅन्सन यांचा जन्मदिन**

'चिकन सूप' मालिकेतील ६१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १३२५०/- । सवलत किंमत ९२७५/-**

---

**९ जानेवारी - विल्बर स्मिथ यांचा जन्मदिन**

'द सेव्हन्थ स्क्रोल', 'रिव्हर गॉड' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६५०/- । सवलत किंमत ११५५/-**

---

**९ जानेवारी - शोभा चित्रे यांचा जन्मदिन**

'एक दिवस', 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**१० जानेवारी - निरंजन घाटे यांचा जन्मदिन**

'आल्फ्रेड रसेल वॅलेस', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'असे घडले सहस्रक', 'असे शास्त्रज्ञ असे संशोधन', 'ज्ञानदीप', 'फार फार वर्षांपूर्वी', 'जिज्ञासापूर्ती', 'ज्याचं करावं भलं', 'पर्यावरण प्रदूषण', 'रोबॉट फिक्सिंग', 'शास्त्रज्ञांचे जग', 'स्वप्नचौर्य', 'तरुणांनो होशियार', 'वसुंधरा', 'वेध पर्यावरणाचा', 'निसर्गपुत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४३७०/- । सवलत किंमत २६२२/-**

---

**११ जानेवारी - अनू अगरवाल यांचा जन्मदिन**

'अनू'प या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**११ जानेवारी - वि. स. खांडेकर यांचा जन्मदिन**

एकूण ११९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९,८७०/- । सवलत किंमत १४,०७२/-**

---

**१२ जानेवारी - स्वामी विवेकानंद जयंती व जागतिक युवा दिन**

‘आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद’, ‘क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता’, ‘चिकन सूप टीनएज सोल भाग १’, ‘चिकन सूप टीनएज सोल भाग २’, ‘चिकन सूप टीनएज सोल भाग ३’, ‘मैत्री अशी आणि तशी’, ‘स्वामी विवेकानंद’, ‘टीनएजर्स’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २०६५/- । सवलत किंमत १२३९/-**

**१२ जानेवारी - मृणालिनी गडकरी यांचा जन्मदिन**
‘क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३०९/-**

**१४ जानेवारी - डेव्हिड कर्कपॅट्रिक यांचा जन्मदिन**
‘द फेसबुक इफेक्ट’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २२९/-**

♦


**- किमतींमध्ये बदलाची शक्यता -**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / Whats App No. **९४२०५९४६६५**
website : www.mehtapublishinghouse.com
**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**
author@mehtapublishinghouse.com

## नवी संहिता... नवा आशय...


**ओशो लिखित तीन नवीन पुस्तके**

**अनुवाद : प्रदीप निफाडकर / शशिकांत सांब**





महावीर आणि अंततप

महावीर आणि नमोकार




महावीर आणि सूत्र




महावीरांचं चिंतन आणि ओशोंचं प्रवचन यांचा अपूर्व संगम

**किंमत प्रत्येकी : ४२०/-रु. । पोस्टेज अतिरिक्त**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

महादेव मोरे यांच्या
संवेदनशील लेखणीतून
उतरलेले प्रभावी कथासंग्रह..






ऐन बहरात कैफ कहरात

निसर्गाचा हिरवा साज
व अस्सल ग्रामीण बाज
असणाऱ्या सुंदर, वास्तव कथा




ग्रामीण मातीतील लोकांची
दाहक जीवनव्यथा मांडणारा कथासंग्रह

गायगुली




पोटासाठी पैसा आणि
पैशासाठी उघडं पाडावं लागणारं पोट यांतील
भीषण वास्तव नागवं करून दाखवणारा...


फरी

ebook available

**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/12/2025 Posting Date : 11/12/2025

## आवर्जून वाचावं



















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति,